दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २१९ I शनिवार २३ मे २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com




‘सहजयोग’

भाग ५९

## तुम्ही परमेश्वराला मिळवलं पाहिजे...

एका फुलापासूनसुद्धा आपण फळं बनवू शकत नाही. अशी ही जी जिवंत क्रिया आहे.. ती करणारी जी ब्रह्मशक्ती आहे. तीला तुम्ही प्राप्त व्हा. असं सर्व साक्षात्कारी साधु संतानी सांगितलेलं आहे. आणि हे जेवढे या महाराष्ट्रात झाले वंदनीय त्यांचे आम च्यावर तर फार उपकार झाले. कारण त्यांनी आपल्या सर्व प्रवचनात किंवा आपल्या अभंगातून किंवा आपल्या काव्यातून सारखं हे सांगितलेलं आहे की तुम्हीं परमेश्वराला मिळवलं पाहिजे.पसायदान हे जे काय आपल्याला वर्णन केलेलं आहे. ज्ञानेश्वरांनी त्याबद्दल जे भवितव्य सांगितलेलं आहे. ते आज यावेळेला आपल्याला मिळणार आहे. ते पसायदान आज मिळायची वेळ आलेली आहे. ते मिळवून घ्यावं. त्यांनी जे केलं ते एकीकडे गेले आणि लोक भलतच करायला लागले.आपल्याला सांगितलेलंच आहे की आपल्यामध्ये जी कुंडलिनी आहे, जी साडेतीन वेटोळे घालून या अस्थीमध्ये बसलेली आहे. ज्याला आपण सेक्रम(डशलर्ओीी)असे इंग्लिशमध्ये म्हणतो. ज्याला माकडहाड म्हणतात. . आणि सेक्रमचा अर्थ असा आहे – पवित्र... अति पवित्र. मी ग्रीक लोकांना विचारलं, तुम्ही याला सेक्रम का म्हटलं? तर म्हणे याच्यात एक अत्यंत पवित्र शक्ती आहे म्हणून आम्ही याला सेक्रम म्हणतो.०२ मे १९८४, कोल्हापूर

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..



### १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

नवी दिल्ली : निवडणूक आयोगाने १० राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ८ जून आहे. या जागांवरील विद्यमान सदस्य २१ जून ते १९ जुलै दरम्यान निवृत्त होत आहेत.निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह आणि माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्यासह २४ खासदारांचा समावेश आहे. आंध्र प्रदेश, गुजरात आणि कर्नाटक या राज्यांमध्ये प्रत्येकी चार जागांसाठी निवडणूक होणार आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी तीन जागांसाठी मतदान होईल. झारखंडमध्येही तीन जागांसाठी निवडणुका होणार आहेत. तसेच मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराम या राज्यांमध्ये प्रत्येकी एका राज्यसभा जागेसाठी मतदान होईल.

## भर उन्हाळ्यात पाण्यासाठी नव्हे...

# पेट्रोल-डिझेलसाठी लांबच लांब रांगा!



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** एकीकडे राज्यात पेट्रोल-डिझेलसाठी रांगा पाहायला मिळतायत. पण दुसरीकडे याच रांगांवरून राजकारणही रंगतंय. पण या सगळ्यात नाहक त्रास सहन करावा लागतोय तो सर्वसामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांनाच. असं असतानाच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मात्र देशात पुरेसा इंधनसाठा असल्याचं विधान केलंय. तर सरकारमधील काही मंत्र्यांनी इंधनटंचाईला साठेबाजी जबाबदार असल्याचं म्हटलंय. असं असलं तरी या साऱ्यामुळे राज्यभरात इंधन टंचाईचे भीषण संकट अधिक तीव्र होताना दिसत आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणानं हैराण झालेला बळीराजा आता पेट्रोल-डिझेल तुटवड्याच्या नव्या संकटामुळे पुरता हतबल झाला आहे. राज्यात अनेक भागात डिझेल मिळत नसल्यानं ट्रॅक्टर बंद पडलेत. ज्याच्याकडे डिझेल इंजिननं पाणीउपसा होतो त्यांना आता पिकांना पाणी देता येत नाहीये. तर शेतमाल बाजारात नेण्यासाठीही शेतकऱ्यांची फरफट सुरू आहे. सरकारच्या नियोजनाच्या अभावाचा सर्वात मोठा फटका पुन्हा एकदा बळीराजालाच बसतो आहे.

**दर सोमवारी 'नो व्हेईकल डे'**

देशात इंधन टंचाईची परिस्थिती निर्माण होत असताना इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी नंदुरबार जिल्हा परिषद पुढे सरसावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, आठवड्याच्या पहिल्या दिवशी अधिकारी आणि कर्मचारी सायकल तसेच दुचाकीचा वापर करून कार्यालयात येणार आहेत.

कधीकाळी दुष्काळी भागातील गावागावात पाण्यासाठी रात्र जागून काढण्याची वेळ यायची. विहिरी, टँकर आणि हंडाभर पाण्यासाठी रांगा लागायच्या. पण काळ बदलला आणि आता तीच रात्र जागून काढण्याची वेळ डिझेलसाठी आली आहे. शेतकऱ्यांच्या अंगणात पाण्यासाठी ठेवलेले कॅन आज डिझेलने भरले जात आहेत. डिझेल तुटवड्यामुळे मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यात शेतकरी आणि वाहनचालकांवर मोठं संकट ओढवलं आहे. एकेकाळी पाण्यासाठी रांगा लावणारा मराठवाडा. आज डिझेलसाठी रात्र जागून काढतोय. पाण्याच्या हंड्यांची जागा आता डिझेलच्या कॅननी घेतली आहे. आणि हा संघर्ष फक्त इंधनाचा नाही. तर शेती, रोजगार आणि ग्रामीण जीवन वाचवण्याचा आहे.

आखाती देशातील युद्धाचा परिणाम आता भंडाऱ्यातील शेतकऱ्यांनाही बसू लागला आहे. वाशिममध्ये सातव्या दिवशीच्या मध्यरात्री शेतकरी आणि वाहनचालकांची डीझल मिळवण्याकरिता जत्रेच स्वरूप पाहवयास मिळालंय. आज दिवसभरात विविध पँपावर चकरा मारू डीझल न मिळाल्याने रात्री उशिरापर्यंत शेतकऱ्यांनी गर्दी केल्याचं चित्र पाहवयास मिळालं.

इंधन साठवणूक करणाऱ्या नागरिकांवर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. पेट्रोलसाठा असूनही पंप बंद ठेवणाऱ्यांची देखील चौकशी होणार आहे. तर यात दोषी पेट्रोल पंप चालकांवर कायदेशीर कारवाई होणार असल्याची माहिती आहे. जिल्ह्यातील सुरू असलेल्या पंपांवर नागरिकांची वाढती गर्दी लक्ष्यात **(पान ४ वर)**

## भक्तीपासून शक्तीकडे शिर्डीच्या नव्या युगाची सुरुवात

**विशेष संपादकीय...**

करण नवले

आंतरराष्ट्रीय धार्मिक स्थळ म्हणून ओळख असलेली शिर्डी आता नव्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभी आहे. साईबाबांच्या श्रद्धा आणि सबुरीच्या संदेशाने जगभरात प्रसिद्ध झालेल्या या भूमीची ओळख आता केवळ अध्यात्मापुरती मर्यादित राहिलेली नाही. देशाच्या संरक्षण क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र म्हणून शिर्डीचा उदय होत असून, हा बदल केवळ अहिल्यानगर जिल्ह्यासाठी नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरणार आहे.

सावळीविहीर औद्योगिक वसाहतीमध्ये उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि निबे समूहाच्या पुढाकारातून साकारलेला हा प्रकल्प ‘आत्मनिर्भर भारत’ आणि ‘मेक इन इंडिया’ या संकल्पनांना प्रत्यक्ष बळ देणारा आहे. खासगी क्षेत्रातील देशातील सर्वांत मोठ्या तोफगोळा उत्पादन क्षमतेचा हा प्रकल्प असल्याने शिर्डी आता भारतीय संरक्षण उद्योगाच्या नकाशावर ठळकपणे उमटणार आहे. **(पान २ वर..)**

## बेलापूर यात्रेमध्ये दोन गटात सशस्त्र धुमश्चक्री

**गाव तसं चांगलं पण गावपुढाऱ्यानी बिघडवलं : ग्रामस्थांमध्ये असंतोष**

**श्रीरामपूर :** शनियात्रेतील पाळण्यावरून तसेच 'काही च्या' हस्तक्षेपावरून दोन गटातील वादाचे रुपांतर हाणामारीतून धुमश्चक्रीत झाले.यावेळी एकमेकांविरुद्ध शस्त्रे काढण्यात आली, त्यावेळी गावठी कट्याचाही धाक दाखविण्यात आला.

यामुळे काहीकाळ दहशत व भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.विशेष म्हणजे सगळाच धक्कादायक प्रकार पोलिस स्टेशनासमोर अन् पोलिसांदेखत घडल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोष निर्माण झाला.मात्र गावात इतकी मोठी घटना घडूनही देखील त्याकडे पोलिसांनी दुर्लक्ष केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.अशाप्रसंगी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कारवाईची अपेक्षा असतानाच पोलिसांनी बघ्याची भूमिका का घेतली.याबाबत याप्रकरणी काय कारवाई होणार? हे पाहावे लागणार आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथे नुकत्याच शनियात्रेत आजवर कधी घडला नाही, हे विशेष.यात्रेत असा अनुचित प्रकार **(पान ४ वर)**

## गर्भलिंग निदान प्रकरणात आणखी दोघांना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या बेकायदेशीर गर्भलिंग निदान व अवैध गर्भपात प्रकरणात लोणी पोलीस आणि श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पथकाने आणखी एक मोठी कारवाई करत दोन जणांना अटक केली आहे. या प्रकरणात आतापर्यंत एकूण १८ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यामध्ये सहा डॉक्टरांचा समावेश असल्याने प्रकरणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे.

**आतापर्यंत १८ आरोपी जेरबंद, सहा डॉक्टरांचा समावेश**

तपासादरम्यान पुणे येथून अटक करण्यात आलेल्या दोन डॉक्टर व वैद्यकीय साहित्य विक्री करणाऱ्या आरोपींकडून नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील दोन डॉक्टरांनीही अवैध लिंगनिदानासाठी वापरली जाणारी सोनोग्राफी मशीन खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने गुरुवारी रात्री उशिरा निफाड येथे धाड टाकून दोघांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये डॉ. कुणाल प्रभाकर वल्टे (वय ३३, रा. सरस्वतीनगर, निफाड) **(पान ४ वर)**

## युवा शक्तीला कमी लेखू नका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कॉक्रोच जनता पार्टी आंदोलनावर आ. कोल्हे यांचे विधान**

**शिर्डी :** सोशल मीडियावर चर्चेत आलेल्या कॉक्रोच जनता पार्टी आंदोलनाने धुमाकूळ घातला असून पाश्वभूमीवर आ. विवेक कोल्हे यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडताना,याकडे केवळ आंदोलन म्हणून पाहण्याऐवजी एकत्र येऊन आपली ताकद दाखवून दिली. मात्र तरुणांच्या भावनेचे विचार आणि सहभागाला कधीही कमी लेखू नये, म्हणून, नाहीतर धोकादायक ठरू शकतात. असा इशाराही त्यांनी दिला. नवनिर्वाचित आ. विवेक कोल्हे यांनी आमदार झाल्यानंतर प्रथमच सपत्नीक शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर प्रसारमाध्यमाशी संवाद साधताना त्यांनी सध्याच्या सामाजिक आणि राजकीय घडामोडींवर मोठं विधान केले.

आ.कोल्हे म्हणाले की, समाजातील जबाबदार व्यक्तींनी तरुणांचा अपमान होईल, अशी विधाने टाळले पाहिजे. आज युवक केवळ सोशल मीडियापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर ते संघटित होऊन आपली भूमिका प्रभावीपणे मांडत आहेत.या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काही राजकीय पक्ष स्वतःचा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी सूचित केले. **(पान ४ वर)**

**नव्या जिल्ह्याच्या दिशेने शिर्डीचे आणखी एक पाऊल...**

## जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयास मंजुरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन जिल्हा कोणता निर्माण होणार, हा प्रश्न गेल्या तीन दशकांपासून चर्चेत आहे. सुरुवातीच्या काळात श्रीरामपूर आणि संगमनेर ही दोन शहरे नव्या जिल्ह्याच्या मुख्यालयासाठी स्पर्धेत असल्याचे मानले जात होते. मात्र मागील काही वर्षांत शिर्डीने या शर्यतीत आघाडी घेतल्याचे चित्र दिसू लागले आहे. अपर जिल्हाधिकारी कार्यालयानंतर आता जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयालाही शासनाने मंजुरी दिल्याने शिर्डीच्या प्रशासकीय महत्त्वात मोठी भर पडली आहे.

राज्य शासनाने जारी केलेल्या अध्यादेशानुसार जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, अहिल्यानगर क्रमांक-२ हे नवीन कार्यालय शिर्डी येथे स्थापन करण्यात येणार आहे. उत्तर नगर जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागाच्या उपविभागांचे नियंत्रण व संचालन करण्यासाठी या कार्यालयाची निर्मिती करण्यात आल्याचे शासन आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या नव्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपूर आणि राहाता या उपविभागांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे उत्तर **(पान ४ वर)**

## आजही पाळतात बालविवाहाची कुप्रथा

- श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागाचे विदारक चित्र
- प्रशासन आणि स्थानिक नेत्यांचे मौन चिंताजनक

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा प्रतिनिधी :** श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागात आजही बालविवाहाची समस्या गंभीर स्वरूपात कायम असल्याचे वास्तव समोर येत आहे. कायद्याने बंदी असतानाही अनेक गावांमध्ये अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह उघडपणे होत असल्याची चर्चा आहे.



विशेष म्हणजे, ग्राम पंचायत स्तरापासून स्थानिक पुढाऱ्यांपर्यंत या सामाजिक प्रश्नावर ठोस विरोध किंवा जनजागृती होताना दिसत नाही. उलट गावची परंपरा म्हणून या प्रकारांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने बालविवाहांना अप्रत्यक्ष पाठबळ मिळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट राहते, आरोग्यावर गंभीर परिणाम होतात आणि त्यांच्या भविष्यावर अक्षरशः कुलूप लागते. मुलगी मोठी झाली, लग्न उरकून टाका ही जुनी मानसिकता अजूनही अनेक भागात घट्ट रुजलेली दिसतेआणि हीच खरी शोकांतिका आहे.

बालविवाह थांबवण्यासाठी प्रशासन कठोर पावले उचलेल, की परंपरेच्या नावाखाली हा अन्याय असाच सुरू राहणार? महिला व बालकल्याण विभाग, पोलीस प्रशासन आणि ग्रामपंचायत यांनी संयुक्त मोहीम राबवून अशा विवाहांना आळा घालणे गरजेचे आहे. अन्यथा बेटी बचाओ, बेटी पढाओ हे फक्त घोषणांपुरतेच राहील, अशी खंत सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.




# भक्तीपासून शक्तीकडे शिर्डीच्या नव्या युगाची सुरुवात

पान १ वरुन

आजपर्यंत शिर्डीची ओळख भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक कार्यासाठी होती. साईबाबा संस्थानच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण आणि सेवाभावाचा मोठा वारसा येथे निर्माण झाला. देश-विदेशातील कोट्यवधी भाविकांनी शिर्डीला जागतिक दर्जाचे धार्मिक स्थळ बनवले. विमानतळ, चारपदरी रस्ते, आधुनिक निवास व्यवस्था आणि वाढती औद्योगिक गुंतवणूक यामुळे शिर्डीचा चेहरामोहरा वेगाने बदलत गेला. आता संरक्षण उत्पादन क्षेत्रातील हा प्रकल्प त्या परिवर्तनाला नवे परिमाण देणारा ठरत आहे.

या प्रकल्पाचे महत्त्व केवळ औद्योगिक गुंतवणुकीपुरते मर्यादित नाही. देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले १५५ मिलीमीटर क्षमतेचे तोफगोळे येथे तयार होणार आहेत. प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची क्षमता असलेला हा कारखाना भारताच्या संरक्षण स्वावलंबनाच्या दिशेने मोठे पाऊल मानला जात आहे. विशेष म्हणजे, उत्पादनासाठी लागणारे तंत्रज्ञान आणि कच्चा माल पूर्णपणे स्वदेशी असणार आहे. हे भारताच्या औद्योगिक क्षमतेचे आणि संशोधन सामर्थ्याचे प्रतीक आहे.

शिर्डी औद्योगिक वसाहतीत रॉकेट लॉँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, ड्रोन तंत्रज्ञान आणि विविध इलेक्ट्रॉनिक प्रणालींच्या चाचणी सुविधा उभारल्या जात आहेत. म्हणजेच भविष्यात शिर्डी हे केवळ तोफगोळा उत्पादन केंद्र न राहता संपूर्ण संरक्षण तंत्रज्ञान क्लस्टर म्हणून विकसित होणार आहे. यामुळे देशातील संरक्षण उत्पादन क्षेत्राला मोठी गती मिळेल. या प्रकल्पामुळे रोजगार निर्मितीची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. हजारो युवकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळणार असून, स्थानिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम




उद्योगांनाही मोठी चालना मिळेल. संरक्षण उद्योगासाठी आवश्यक असणारे पूरक उद्योग, लॉजिस्टिक, अभियांत्रिकी सेवा, इलेक्ट्रॉनिक्स आणि तांत्रिक प्रशिक्षण यामुळे संपूर्ण परिसराच्या आर्थिक विकासाला गती मिळेल. ग्रामीण भागातील युवकांसाठी हे नव्या संधींचे दार उघडणारे ठरणार आहे.

शिर्डीमध्ये आयोजित करण्यात आलेले संरक्षण साहित्य प्रदर्शन हे देखील विशेष महत्त्वाचे आहे. विद्यार्थी, विज्ञानप्रेमी आणि सामान्य नागरिकांना रॉकेट, क्षेपणास्त्रे आणि आधुनिक संरक्षण उपकरणे जवळून पाहण्याची संधी मिळणार आहे. संरक्षण क्षेत्रातील करिअर, संशोधन आणि उद्योग संधींबाबत तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हे प्रदर्शन प्रेरणादायी ठरेल. विज्ञान आणि राष्ट्रसुरक्षा यांची सांगड घालणारा हा उपक्रम भविष्यकालीन भारताची दिशा स्पष्ट करणारा आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के. के. रेंजेस आणि मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याचे संरक्षण क्षेत्राशी जुने नाते आहे. आता नव्या औद्योगिक प्रकल्पांमुळे त्या परंपरेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळत आहे. भविष्यात हा जिल्हा देशातील महत्त्वाचा संरक्षण उत्पादन हब म्हणून ओळखला जाईल, अशी चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. या सर्व घडामोडींमध्ये पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतलेला पुढाकारही महत्त्वाचा मानावा लागेल. विमानतळापासून एमआयडीसीपर्यंत आणि आता संरक्षण प्रकल्पांपर्यंत शिर्डीच्या विकासाची नवी दिशा त्यांनी उभी केली आहे. धार्मिक पर्यटनावर आधारित अर्थव्यवस्थेला औद्योगिक आणि तांत्रिक विकासाची जोड मिळाल्यास एखाद्या शहराचा सर्वांगीण विकास कसा होऊ शकतो, याचे उदाहरण शिर्डी देत आहे.

भारत आज जागतिक स्तरावर संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. पूर्वी परदेशातून आयात होणाऱ्या संरक्षण साहित्याचे उत्पादन आता देशातच होऊ लागले आहे. भविष्यात भारत जागतिक शस्त्र निर्यातीतही मोठी भूमिका बजावेल, असा विश्वास निमर्ण होत आहे. त्या प्रवासात शिर्डीचा सहभाग ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. भक्ती आणि शक्तीचा संगम घडवणारी शिर्डी आता नव्या भारताच्या सामर्थ्याचे प्रतीक बनत आहे. साईबाबांच्या भूमीतून देशाच्या सुरक्षेला बळ देणारे उत्पादन तयार होणार आहे, हीच या परिवर्तनाची खरी ओळख ठरेल. भारतीय संरक्षण इतिहासात २३ मे २०२६ हा दिवस निश्चितच सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल.

## फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि यंत्रास पेटंट



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पामध्ये संशोधित केलेल्या ट्रॅक्टरचलीत स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित या यंत्रास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने पेटंट प्रदान केले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली या यंत्राच्या संशोधनात महत्वाचे योगदान देणारे अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुलसीदास बास्टेवाड तसेच त्यांचे सहकारी डॉ. संजय भांगरे, डॉ. रवीकिरण राठोड, इंजि. रोहित गेठे यांचा यामध्ये सहभाग आहे.

सदर यंत्र ५५ अश्वशक्ति आणि त्यापेक्षा जास्त ट्रॅक्टरने सहज चालते, स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित एकत्रित मशागतीने पेरणी योग्य जमीन तयार करण्यासाठी उपयुक्त आहे. या यंत्राच्या वापरामुळे मशागतीसाठी लागणार्या खर्चात आणि वेळेत बचत होते. एका तासांमध्ये ०.३३ हेक्टर क्षेत्रावर मशागत करता येते. या यंत्राच्या वापरामुळे पारंपारिक पद्धतीपेक्षा खर्चामध्ये ४४% पर्यंत बचत होते. एकत्रित मशागत करण्यासाठी विकसीत करण्यात आलेल्या या ट्रॅक्टरचलीत फुले स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित या यंत्रास राज्यस्तरीय संयुक्त कृषि संशोधन व विकास समिती बैठक-२०२५

मध्ये प्रसारीत करुन शिफारशीत करण्यात आलेले आहे. कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (कृषि अभियात्रिकी) डॉ. एस.एन. झा, सहाय्यक महासंचालक डॉ. के. पी. सिंग, भोपाळ येथील केंद्रिय कृषि अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ. सी.आर. मेहता, अखिल भारतीय समन्वीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प संचालक डॉ. पी.एन. अग्रवाल व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी या पेटंटमध्ये सहभागी शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे. कृषि विद्यापीठाच्या सर्व स्तरातुन संबंधीत शास्त्रज्ञांचे अभिनंदन होत आहे.

## ना.विखे यांच्यामुळे कडक उन्हाळ्यात ओढ्यावरील बंधारे तुडुंब भरले : डॉ शंकर मुठे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव** : - मुठेवाडगांव शिवारातील ओढ्यावरील मालीकेतील सर्व बंधारे राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर पालकमंत्री ना .राधाकृष्ण विखे पाटील यांचे आदेशानुसार पाण्याने तुडुंब भरले असल्याचे प्रतिपादन भाजपा तालुका उपाध्यक्ष डॉ शंकर मुठे यांनी जलपूजन कार्यक्रमात बोलताना केले. लाभधारक शेतकऱ्यांचे सहकार्याने नविन झालेल्या शिंदे बंधारा येथे श्री संत तुळशीराम महाराज मंदिर पुजारी किसन महाराज लोखंडे यांचा हस्ते पाण्याची खना नारळाने ओटी भरून पूजा करण्यात आली. गावातील परिसरतील बंधारे भरण्यासाठी ना.विखे पाटील यांच्या कडे शेतकऱ्यांचे वतीने आपण पाठपुरावा केला होता. त्यासाठी त्यांना भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष दिपक अण्णा पटारे, बाजार समिती मा.संचालक गिरिधर आसने ,भाजपा सरचिटणीस भैरव कांगुने यांनी मदत केली. पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कॅनॉल ईनेस्पेक्टर सह कर्मचारी यांचेही सहकार्य मिळाले.परिसरातील शेतकरी यांनी पालक मंत्री विखे पाटील यांचे आभार मानले असल्याचे शेवटी डॉ मुठे म्हणाले. यावेळी माजी सरपंच शिवाजी मुठे, भिकचंद मुठे, रंजक मुठे, ग्रामपंचायत सदस्य किशोर साठे, दिनकर मुठे,तंटामुक्ती अध्यक्ष सोपानराव मुठे,तात्यासाहेब चौधरी, रामेश्वर मुठे,मारुती जासूद,जालिंदर मुठे, डॉ.गोकुळ मुठे,राजू मुठे,पूनम रुपटक्के,रविंद्र मुठे,सोमनाथ शेळके,योगेश आसने,भाऊसाहेब मुठे,ओम मुठे, वेदांत मुठे सह अनेक शेतकरी,ग्रामस्थ उपस्थित होते.



## सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत ५७ विद्यार्थी पात्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाने शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या अंतरिम निकालात इयत्ता पाचवीचे ३१ व इयत्ता आठवीचे २६ असे एकूण ५७ विद्यार्थी पात्र ठरले असून विद्यालयाची उज्ज्वल यशपरंपरा कायम राखली आहे.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत अवधूत राजेंद्र भुजाडी याने २२६ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तसेच वेदराज पानसंबळ (२१८), प्रज्वल लांबे (२०४), नीती झावरे (२००), भक्ती गाडे (१९८) आणि स्वानंदी सिन्नरकर (१९६) यांनीही उल्लेखनीय यश मिळविले.

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत किमया निलेश तरवडे हिने २८४ गुण मिळवून तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळविला. देवाशीष तोडमल (२२०), प्रथमेश राहींज (२१६),





श्रुती सिरसीम (२१४), महिमा हराळे (२१२), श्रुतिका धनवडे (१९४) व वेदांत गावडे (१९४) यांनीही उत्कृष्ट गुण मिळविले.

विद्यार्थ्यांच्या यशासाठी विद्यालयात जादा तासांचे नियोजन, तज्ञांचे मार्गदर्शन व नियमित सराव परीक्षा घेण्यात आल्या. मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे व पर्यवेक्षक मनोज बावा यांचे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन लाभले.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना तुकाराम जाधव, सविता ढोमसे, सविता गव्हाणे तर इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना हलीम शेख, गोकुळ ठाकूर, सचिन सिन्नरकर व रवींद्र हरिश्चंद्रे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल कुलगुरू डॉ. विलास खर्चे, डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. महानंद माने, महेश घाडगे यांच्यासह विद्यालय प्रशासनाने विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## नेवासेला अवकाळी पावसाचा तडाखा





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील पश्चिमे पट्ट्यातील गावात शुक्रवारी दुपारी वादळी वाऱ्यासह पावसाची जोरदार हजेरी लावली.या परिसरातील अनेक ठिकाणी मोठे नुकसान झाले असून, यातच शेतकऱ्यांचे राहत्या घराचे पत्रे, छोट्या टपऱ्या, सोलर पॅनलचे मोठे नुकसान झाले. नेवासा - राहुरी रस्त्यावर अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला.या दृष्टीने रस्त्यावर झाडे बाजूला काढण्यासाठी स्थानिक नागरिकाचे शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत.या अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावल्याने शेतकऱ्यांसह व्यावसायिकाची चांगलीच धांदळ उडाली होती.परिसरात वादळी वाऱ्यामुळे विजेचे खांब, ताराही जमीनदोस्त झाल्याचे माहिती मिळाली आहेत. वीजपुरवठा सुरळीत सुरू नसल्याचे सागितलं जाते.राहुरी तालुक्यातील पुर्व भागातील मुळाथडी परिसरात वादळीवाऱ्यासह पाऊस झाला. याबाबत कोणतेही जिवितहानी घटनेची घडलेली नाही.मात्र मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाल्याचे सागण्यात आले.मे महिन्यात अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्याने हजेरी लावली. अवकाळी पावसाने वरात पाणी साचले होते.

## भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या मायलेकाला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : भांडण सोडण्यासाठी गेलेल्या आई व मुलाला आरोपींनी शिवीगाळ करुन लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी बेदम मारहाण करून आईचा विनयभंग केल्याची घटना दि. १६ मे रोजी सायंकाळी राहुरी तालुक्यातील डिग्रस परिसरात घडली. एक ५५ वर्षीय महिला त्यांच्या कुटुंबासह राहुरी तालुक्यातील डिग्रस परिसरात राहतात. दि. १६ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास आरोपींचे भांडण सुरु होते. तेव्हा सदर महिला व त्यांचा मुलगा भांडण सोडवण्यासाठी गेले. तेव्हा आरोपींनी आई व मुलाला शिवीगाळ करुन लाकडी काठी व लाथा बूक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच आईला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करुन विनयभंग केला. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील अर्धा तोळे वजनाची सोन्याची पोत बळजबरीने तोडुन घेतली. तसेच तुम्ही परत आमचे भांडण सोडवण्यास आले तर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी जिवे मारण्याची धमकी दिली.घटने नंतर पिडीत महिलेने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी देविदास दत्तु कोळेकर व योगिता देविदास कोळेकर, दोघे रा. डिग्रस, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात हवालदार विकास वैराळ हे करीत आहे.

## राहुरीत आरक्षण उपवर्गीकरणा विरोधात आंबेडकरी समाज आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधात राहुरी तालुक्यातील आंबेडकरी समाजाने आंदोलनाचा इशारा दिला असून, दि. १ जून २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या लोणी येथील निवासस्थानी पायी लाँग मार्च काढण्यात येणार असल्याचा इशारा अनुसूचित जाती आरक्षण बचाव कृती समिती, राहुरी तालुक्याच्या वतीने देण्यात आला आहे. या संदर्भात राहुरीच्या तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून. सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयानुसार राज्य



सरकारला अनुसूचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरणाचे अधिकार देण्यात आले असले तरी, त्यामुळे अनुसूचित जातींमध्ये सामाजिक दुरावा निर्माण होण्याची भीती असल्याचे निवेदनात म्हटले आहे. राज्य सरकारने कोणतेही उपवर्गीकरण करू नये, केंद्र सरकारने पुनर्विचार याचिका दाखल करावी, जातनिहाय जनगणना करूनच पुढील धोरण ठरवावे तसेच पदोन्नतीमधील आरक्षण लागू करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुसूचित जाती हा एकसंध प्रवर्ग ठेवला असून उपवर्गीकरणामुळे समाजात फूट पडू शकते, असा दावा समितीने केला आहे. यावेळी आरपीआय राहुरी तालुकाध्यक्ष विलास साळवे,पिंटू नाना साळवे,वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव, आर पी आय नेते भाऊसाहेब पगारे,प्रवीण लोखंडे,संजय संसारे,सचिन साळवे,सुनील चांदणे,सागर साळवे, संतोष दाभाडे, दीपक साळवे, संजय साळवे, किरण साळवे प्रवीण जाधव, रॉबर्ट सॅम्युअल, ईश्वर खिलारी, दत्तू पलगडमल, राजू साळवे, करण साळवे,नागेश जाधव,दादू साळवे,अतुल त्रिभुवन,नंदू सांगळे,यमुना भालेराव,आदींसह तालुक्यातील अनेक आंबेडकरी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रील तयार करण्यासाठी पिस्तूल वापरल्याने दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : धारदार कत्ती व पिस्तुल सारखे वस्त्र जवळ बाळगून त्याचा रिल करुन इन्स्टाग्रामवर व्हायरल करण्यात आला. पोलिस प्रशासनाने रिल बनवणाऱ्या दोन जणांवर आर्म अॅक्टचा गुन्हा दाखल केलाय. रील बनवून व्हायरल केल्याची घटना चांगलीच अंगलट आली. या घटनेची तालुक्यात जोरदार चर्चा सुरु आहे. राहुरी पोलिस ठाण्यातील पोलीस उप निरीक्षक गणेश वाघमारे यांना दि. १९ मे २०२६ रोजी दुपारी १२.४५ वाजेच्या सुमारास गोपनीय बातमीदारा मार्फत व्हिडिओ प्राप्त झाला होता. एका इस्टाग्राम आयडीवर राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील दोन तरुणा पैकी एकाच्या हातामध्ये कत्ती सारखे घातक व धारदार हत्यार घेवुन दहशत निर्माण करत आहे. तसेच दुसरा तरुण तरुणाच्या हातामध्ये पिस्तुल सारखे शस्त्र दिसत असुन दोघेही जनतेच्या मनामध्ये भिती निर्माण व्हावी म्हणुन त्यांनी सदरची रिल तयार केल्याचे दिसून आले. हवालदार रवि गोविंद पवार यांच्या फिर्यादीवरून आरोपी प्रशांत उर्फ चाचा रावसाहेब पडघलमल, रा. सात्रळ, ता. राहुरी, व एक अनोळखी इसम अशा दोन जणांवर आर्म अॅक्टचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## साहित्यातून जीवन प्रवासाचा खरा अर्थ उलगडतो : डॉ. सुवर्णाताई चव्हाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : मराठी ग्रामीण साहित्य संमेलनातून व्यक्तिमत्त्व घडते तसेच साहित्यातून जीवन प्रवासातील विविध पैलूंचा खरा अर्थ उलगडतो, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूरच्या मराठी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. सुवर्णाताई चव्हाण-गुंड यांनी केले. ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळीभान यांच्या वतीने आयोजित चौथ्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन व उत्कृष्ट मराठी अध्यापन साहित्य सेवा पुरस्कार कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुवर्णाताई चव्हाण होत्या, तर उद्घाटक म्हणून डॉ. राजन लाखे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मराठी साहित्य



संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये, प्रा. संजय पवार, जल अभ्यासक भिला सोनू पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी भिला सोनू पाटील लिखित 'गावपण' या ग्रामीण जीवनावरील पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उत्कृष्ट मराठी अध्यापक, साहित्यिक तसेच सामाजिक, शैक्षणिक व आदर्श कार्य करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. प्रा. संजय पवार यांना 'साहित्य सेवा जीवन गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले.

डॉ. चव्हाण पुढे म्हणाल्या की, मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती ज्ञान, संस्कृती आणि अस्मितेची भाषा आहे. जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजीचे महत्त्व मान्य असले तरी मायबोली मराठीचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

दुसऱ्या सत्रात महावीर सिंग चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन पार पडले. विविध ग्रामीण कवींनी कविता सादर करत रसिकांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापूसाहेब तनपुरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संदीप पटारे यांनी मानले.

## श्री संत नागेबाबा मल्टिस्टेटच्या सभासदाला सुरक्षाकवच धनादेश प्रदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव** : श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट संस्था वर्षाचे ३६५ दिवस ग्राहकांना सेवा देताना केवळ आर्थिक क्षेत्रात कार्य न करता आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो या उद्देशाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कडूभाऊ काळे यांच्या मार्गदर्शनातून व संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक, शैक्षणिक,सामाजिक व सभासदांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करत आहे. संस्थेतील प्रत्येक सभासद हा आपला परिवारातील घटक आहे. याचा विचार करून आपल्या संस्थेतील सभासदांसाठी नागेबाबा सभासद सुरक्षा कवच योजना चालू केलेली आहे. यामध्ये अपघाती मृत्यू झाल्यास सभासदांच्या वारसांना १० लाख



रुपयांपर्यंत आर्थिक मदत करण्यात येते. तसेच अपघात झाल्यास ५ लाख रुपयांपर्यंत हॉस्पिटल खर्च देण्यात येतो. या योजनेतून त्या कुटुंबाचा खरा आधार देण्याचे काम संस्था करत असते. श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट देडगाव शाखेचे खातेदार सभासद ज्ञानदेव भाऊराव मुंगसे यांचा काही दिवसांपूर्वी रस्ते अपघात झाला होता. त्यांनी नागेबाबा सुरक्षा कवच योजनेअंतर्गत नाव नोंदणी केलेली होती. आज त्यांना ६६,४१६/- रुपयांचा धनादेश नागेबाबा मल्टिस्टेटच्या वतीने देडगाव शाखेचे खातेदार व मान्यवरांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आला.या कार्यक्रमप्रसंगी एरिया डेव्हलपमेंट ऑफिसर नांदे सर यांनी प्रास्ताविक केले. नागेबाबा परिवाराचे सक्रिय सदस्य आरोग्य मित्र सुभाष मामा गायकवाड यांनी आरोग्य विषयक सुरक्षा कवच योजना विषयी मार्गदर्शन केले. यावेळी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक बाजीराव पाटील मुंगसे, सरपंच चंद्रकांत पाटील मुंगसे, मार्केट कमिटीचे कडूभाऊ तांबे, बालाजी देवस्थानचे विश्वस्त सुनील मुथ्था, संभाजी काजळे, किशोर तांबे, संजय तांबे, आकाश चेडे, भाऊराव मुंगसे, पाराजी पुंड, विलास मुंगसे, नवनाथ पळसकर, महादेव वांढेकर, अशोक मुंगसे, रामराव कुटे, जनार्धन मुंगसे भास्कर चेडे, अंबादास तांबे, हरिभाऊ बावधनकर, किशोर पुंड, राजाराम तांबे, कचरू तांबे, बाळासाहेब पाठक, गंगाधर तांबे, अरुण मुंगसे, डॉ. पोपट तांबे, अक्षय तिडके, राहुल मुंगसे, नेवासा शाखेचे शाखाधिकारी गणेश वायकर साहेब आदी मान्यवर उपस्थित होते. शाखाधिकारी पांडुरंग एडके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### कवयित्री संगीता फासाटे यांना पीएच.डी. पदवी घोषित

**शिरसगाव** : खासदार गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेतील इंदिरानगर, शिरसगाव येथील शिक्षिका व कवयित्री संगीता चंद्रभान फासाटे-कटारे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी घोषित करण्यात आली आहे. याबाबतचे अधिकृत पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले. शेवगाव येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक डॉ. वसंत रघुनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी साठोत्तरी ग्रामीण कवितेचा गेय आविष्कार : एक अभ्यास हा संशोधन प्रबंध सादर केला होता. या यशाबद्दल संस्थेच्या चेअरमन पुष्पलता आदिक, अध्यक्ष डॉ. बबनराव आदिक, सचिव अविनाश आदिक, अनुराधा आदिक, ड. जयंत चौधरी, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये आदींसह विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. संशोधन कार्यासाठी डॉ. संदीप सांगळे, डॉ. शिरीष लांडगे, डॉ. माहेश्वरी गावित, डॉ. सर्जेराव जिगे, सौ. उषा गाडेकर, अशोक गाडेकर, डॉ. शिवाजी काळे, चंद्रभान फासाटे गुरुजी, अशोक कटारे व प्रा. डॉ. मनिषा पोखरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

### सुभाष पोखरकर यांना जीवन गौरव पुरस्कार



**शिरसगाव** : ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, टाकळीभान., या संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय सामाजिक जीवन गौरव पुरस्कार जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते बी. आर. तथा सुभाषराव पोखरकर यांना राजन लाखे (अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद), डॉ.सुवर्णा चव्हाण (अध्यक्ष मराठी साहित्य मंडळ, सोलापूर), प्रा. डॉ. प्रदीप ढवळ (उपाध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष इंद्रसिंग राजपूत, पुणे जिल्हा समन्वयक दिलीप कहाणे, उत्तर महाराष्ट्र संघटक बापूराव बहिरट, सुरेश कटारिया, बाबासाहेब चेडे, संपत मुठे, दत्तात्रय पटारे बशीर बेग, भारत छल्लारे उपस्थित होते.

### मंडप व्यावसायिकाच्या मुलीची पोलीस दलात निवड



**राहुरी** : येथील मंडप व्यवसायिक पेंटर सोनार मंडपवाले म्हणून प्रसिद्ध असलेले अर्जुन गजानन बुऱ्हाडे यांची मुलगी वृषाली बुऱ्हाडे हिचे महाराष्ट्र पोलीस दलाच्या पुणे शहर चालक व सोबतच मुंबई शहर पोलीस अशा दोन्ही ठिकाणी एकाच वेळेस निवड झाल्याबद्दल शहरातील विद्यामंदिर प्रशाला येथे सत्कार सोहळा आयोजित केला होता. तत्पूर्वी शहरातील शनी मंदिर ते कार्यक्रम स्थळापर्यंत वृषालीची सोनार समाजाच्या वतीने वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ उषाताई तनपुरे या होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून कर्मवीर अक्ॅडमीचे संस्थापक अध्यक्ष मेजर राजेंद्र कडू होते. यांच्या समवेत राहुरी शहराचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर,जामखेडच्या नगराध्यक्षा पुनम चिंतामणी, विद्या मंदिर प्रशालेचे मुख्याध्यापक कैलास अनाप, सुजाताताई तनपुरे, सायली हर्ष तनपुरे, राहुरी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, नगरसेवक डॉ. संतोष उदावंत, किशोर जाधव, सुवर्णकार समाज राहुरीचे अध्यक्ष बंडूशेठ उदावंत, राहुल डहाळे मान्यवर उपस्थित होते.

# प्रवरा अभियांत्रिकीच्या वेदांत बोरावकेचा नासाकडून गौरव

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथे प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी विद्यार्थी वेदांत बोरावके यांना अमेरिकेतील नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस डमिनिस्ट्रेशन (नासा) कडून सायबर सुरक्षा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष प्रशस्तीपत्र प्राप्त झाले आहे.



प्रवरा रुरल इंजिनियरिंग कॉलेजचा विद्यार्थी वेदांत बोरवके यांने नासाच्या व्हल्नरॅबिलिटी डिस्कॉलर डिसक्लोजर प्रोग्राम अंतर्गत सुरक्षा त्रुटी शोधून त्याबाबत जबाबदारीने अहवाल सादर केला. त्यांच्या या कार्याची दखल घेत नासाकडून त्यांना विशेष गौरवपत्र प्रदान करण्यात आले. तसेच वेदांत यांनी नोकिया तसेच इतर नामांकित संस्थांच्या सुरक्षा संशोधनामध्येही मोलाचे योगदान दिले आहे. सायबर सुरक्षा क्षेत्रातील त्यांच्या संशोधनामुळे आणि उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयासह संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.

संस्थेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांच्या हस्ते वेदांत बोरावके यांचा सत्कार करण्यात आले. यावेळी डॉ.विखे पाटील म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत संशोधन व आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात प्राविण्य मिळविणे ही अभिमानाची बाब आहे. वेदांतचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनियरिंग विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सीमा लव्हाटे व सर्व प्राध्यापक यांनीही वेदांत यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने आदींनी अभिनंदन केले आहे.

# २३ वर्षांनंतर पुन्हा जुळले मैत्रीचे धागे

## गुहा येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साहात

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा माध्यमिक विद्यालय, गुहा (ता. राहुरी) येथील सन २००३ च्या दहावी बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. तब्बल २३ वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्रमैत्रिणींनी जुन्या आठवणींना उजाळा देत मैत्रीचे बंध अधिक दृढ केले.




या स्नेहमेळाव्यात आयटी, औषधनिर्माण, मेकॅनिकल, कृषी, विधी, शिक्षण, राजकारण, विपणन तसेच प्रगतशील शेती क्षेत्रात कार्यरत असलेले सुमारे ३५ माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. विशेष म्हणजे, सन २००३ मध्ये विद्यालयात कार्यरत असलेले शिक्षक तसेच सध्याचे शिक्षकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीबद्दल समाधान व्यक्त करत पुढील आयुष्यास शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमात विविध खेळ, गाणी, जुन्या आठवणींना उजाळा देणाऱ्या मनमोकळ्या गप्पा यामुळे दिवसभर आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सामाजिक बांधिलकी जपत माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी विद्यालयाला आर.ओ. जलशुद्धीकरण यंत्र भेट दिले. तसेच विद्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. स्नेहमेळाव्याचे सूत्रसंचालन शीतल गोंधळे यांनी केले, तर प्रा. महेश चंद्रे यांनी आभार मानले.

# गाव कामगार पोलीस पाटील संघटनेच्या मेळाव्यास प्रतिसाद



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : गाव कामगार पोलीस पाटील संघटनेचा प्रथम वर्धापन दिन व राज्यस्तरीय मेळावा नेवासा-नेवासा फाटा रोडवरील लक्ष्मी मंगल कार्यालयात उत्साहात पार पडला.

राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या मोठ्या उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यात संघटनेच्या एका वर्षातील कार्याचा आढावा घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापूजनाने झाली. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक व राज्याध्यक्ष शिवाजीराव कोलते पाटील होते. यावेळी माजी आमदार पांडुरंग अभंग तसेच पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी मार्गदर्शन करत ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलीस पाटील यांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.

संघटनेने मागील वर्षभरात मानधनवाढ, सेवा निवृत्ती वयोमर्यादा वाढ, आरोग्य कार्ड, निवृत्तीनंतर आर्थिक मदत तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्याची माहिती यावेळी देण्यात आली. अध्यक्षीय भाषणात शिवाजीराव कोलते पाटील म्हणाले, संघटना ही केवळ पदांची नसून पोलीस पाटील बांधवांच्या न्यायहक्कांसाठी लढणारी चळवळ आहे. राज्यभरातील पोलीस पाटील यांना संघटित करून त्यांचे प्रश्न शासन स्तरावर प्रभावीपणे मांडले जातील. तसेच संघटनेत पारदर्शकता, शिस्त, निष्ठा व एकजूट कायम ठेवून सर्वसामान्य पोलीस पाटील यांना केंद्रस्थानी ठेवून कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.


कार्यक्रमात विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करत संघटनेच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. भविष्यात पोलीस पाटील बांधवांच्या प्रश्नांसाठी अधिक ताकदीने लढण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बुलढाणा जिल्हाध्यक्ष राजेंद्र भामद्रे पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष अशोक थेटे पाटील यांनी केले. मेळाव्यास राज्यभरातील अनेक पोलीस पाटील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वारकरी बालसंस्कार शिबिराची सांगता

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तीर्थक्षेत्र नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने उन्हाळयाच्या सुट्टीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरात आयोजित केलेल्या पंधरा दिवशीय वारकरी बाल संस्कार शिबिराची वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या किर्तनाने भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. यावेळी वेदांताचार्य देविदास महाराजांनी वद्य वारीला दर्शनाला येण्यासाठी व वारीचे वैभव वाढविण्याचे आवाहन उपस्थित भाविक व विद्यार्थी पालकांना केले.



संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे मार्गदर्शक वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या शिबिरातील मुलांना अमूल्य मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरात सकाळी साडेपाच वाजता हनुमान चालीसा पठण कार्यक्रम, पहाटे सहा वाजता आरती झाल्यानंतर संतसेवक आदिनाथ महाराज पांगरे व संतसेवक दामोदर पवार यांनी मुलांकडून योगासने करून घेतली.

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक गुरुवर्य वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी बाल वारकऱ्यांचा गीता पाठ, उपस्थित महाराज मंडळींनी वेगवेगळ्या अभंग ओवी पाठ करून घेतल्या

यामध्ये गहिनीनाथ महाराज आढाव यांनी देखील प्रशिक्षण देण्यासाठी मोलाचे योगदान दिले. दुपारच्या सत्रात मुलांकडून वेगवेगळे खेळ गप्पागोष्टी असे विरंगुळा प्राप्त करणारे कार्यक्रम घेण्यात आले.दोन तास विश्रांती नंतर संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त गायनाचार्य ज्ञानदेव माऊली शिंदे यांनी मुलांना मार्गदर्शन करून अभंग गायनाच्या संदर्भात मार्गदर्शन केले,उपस्थित मृदुंगाचार्य महाराज मंडळीच्या मार्फत मृदंगाचे प्रशिक्षण देण्यात आले. बाल वारकऱ्यांना विविध अभंगासह भजन शिकविण्यात आले, सायंकाळी ५ वाजता सामुदायिक हरिपाठ ,सायंकाळी ७ वाजता शिबिरातील सर्व बालवारकऱ्यांना सायंकाळचे भोजन नित्यनेमाने दिले गेले,सकाळी श्रीमद भगवत गीतेची तसेच रात्री वेगवेगळ्या स्तोत्रांची संथा गुरुवर्य देविदासजी महाराज म्हस्के यांनी दिली.निशुल्क आयोजित केलेल्या बाल संस्कार शिबिरात बाल वारकऱ्यांनी वारकरी संप्रदायातील मृदुंग वादन, हार्मोनियम वादन, गायन आदी प्रशिक्षण घेतले

वारकरी बाल संस्कार शिबिराच्या सांगता प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त व मार्गदर्शक हभप वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांचे किर्तन झाले. सर्वांना महाप्रसादाचे वाटप करून शिबीराची सांगता करण्यात आली. शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग व सर्व विश्वस्त मंडळींनी उत्कृष्ट नियोजन मोलाचे ठरले.

# विकास लवांडे यांच्या व्याख्यानाला परवानगी देऊ नका, निवेदन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : वारकरी संप्रदायावर अत्यंत खालच्या स्तरावर जाऊन वक्तव्य करणारे विकास लवांडे यांच्या संगमनेर येथील प्रस्तावित व्याख्यानाला पोलीस प्रशासनाने परवानगी देऊ नये, अन्यथा उद्भवणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी पोलीस प्रशासन यांची राहील, असा इशारा वारकरी क्रांती सेना आणि राष्ट्रीय वारकरी परिषद प्रणित वैदिक हिंदू वारकरी बहुउद्देशीय सेवा संघ यांच्या वतीने देण्यात आला आहे.

सत्यशोधक विचारमंच संस्थेच्या वतीने व्यापारी असोसिएशन हॉल येथे २४ मे २०२६ रोजीसंतांचा वारकरी संप्रदाय या विषयावर विकास लवांडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. याच विकास लवांडे यांनी काहीदिवसापूर्वी वारकरी संप्रदायाच्या भावना दुखावणारी वक्तव्ये केली होती. त्यामुळे वारकरी संघटनांनी या कार्यक्रमाला तीव्र विरोध दर्शविला आहे. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि संत परंपरेचा आत्मा असून संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्या परंपरे विषयी विकास लवांडे यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी धार्मिक भावना दुखावल्या बद्दल वाघोली पोलीस ठाण्यामध्ये त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. संगमनेरला आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विकास लवांडे यांनी पुन्हा प्रक्षोभक अथवासमाजात तेढ निर्माण करणारे वक्तव्य केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे लवांडे यांच्या व्याख्यानाला पोलीस प्रशासनाने परवानगी देऊ नये, अशी मागणी वारकरी संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे.याबाबतचे निवेदन लक्ष्मण महाराज पानसरे, वेणूनाथ महाराज विखे, विठ्ठल महाराज अभंग, रोहिणीताई महाराज राऊत, ज्ञानदेव महाराज पानसरे, शिवाजी महाराज खेमनर, अनिल महाराज घुले, शांताराम घुले, संभाजी घुले, भाऊसाहेब शिंदे, सुनील शिंदे, सीताराम वाघमोडे आणि मुरलीधर खताळ यांनी पोलीस प्रशासनाला दिले आहे.


# एल निनो संकटाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी सतर्क राहावे : डॉ. ढगे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : यंदाच्या खरीप हंगामात एल निनोमुळे पावसाचे प्रमाण घटण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी कृषी अधिकारी व कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग्य नियोजन करून सतर्क राहावे, असे आवाहन कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोकराव ढगे यांनी केले आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने खरीप हंगाम २०२६ साठी कृत्रिम पावसाच्या पर्यायाचा गांभीर्याने विचार करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारतीय हवामान विभागाने यावर्षी खरीप हंगामात पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. सुरुवातीला ९२ टक्के पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला होता; मात्र आता तो ८८ टक्क्यांवर आला आहे. पॅसिफिक महासागरातील वाढलेल्या तापमानामुळे एल निनोचा परिणाम होऊन




ढग निर्मितीवर परिणाम होत असल्याचे डॉ. ढगे यांनी सांगितले.

### पीक व्यवस्थापनावर भर देण्याचा सल्ला

शेतकऱ्यांनी पिक, पाणी व खत व्यवस्थापनात बदल करून नियोजन करावे. कमी पावसात तुरीचे पीक फायदेशीर ठरू शकते. केंद्र शासनाने तुरीच्या हमीभावात प्रतिक्विंटल ४५० रुपयांची वाढ केली असल्याने शेतकऱ्यांनी तुरीकडे वळावे, असे त्यांनी सांगितले.

बीबीएफ पद्धतीने पेरणी करणे, १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच पेरणी करणे, उताराला आडवी पेरणी करणे, सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे तसेच शेततळे, विहीर, बोअरवेल यांच्या माध्यमातून संरक्षित पाण्याची व्यवस्था ठेवावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

### निंबोळी अर्क फवारणीचा सल्ला


तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी पाच टक्के निंबोळी अर्काची फवारणी उपयुक्त ठरते. तुरीला नत्र कमी लागते, त्यामुळे युरियाचा वापर मर्यादित ठेवून गरज असल्यास फवारणीद्वारे वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरीप आढावा बैठकीत पीक कर्ज व कर्जमाफीबाबत दिलेल्या सूचनांचे स्वागत करत शेतकऱ्यांनी अधिकाधिक तांत्रिक मार्गदर्शन घेण्याचे आवाहन डॉ. ढगे यांनी केले.

# हलाखीच्या परिस्थितीतून घुगे बंधूंची भारतीय सैन्य दलात भरारी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील खळी येथील छोट्याशा कांगणवाडी गावातील अत्यंत गरीब कुटुंबातील तिन्ही सख्खे भाऊ भारतीय सैन्य दलात भरती झाल्याने परिसरात अभिमानाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अभिषेक, ऋषिकेश आणि तेजस घुगे या तिन्ही भावांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यश संपादन केले आहे.



घुगे कुटुंबावर २०१२ मध्ये मोठे संकट कोसळले. वडिलांचे निधन झाल्यानंतर घरात आई मीनाबाई मोहन घुगे आणि तीन लहान मुले अशी परिस्थिती होती. त्यावेळी मोठा मुलगा अवघा आठ वर्षांचा, दुसरा सहा वर्षांचा तर धाकटा चार वर्षांचा होता. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीतून उत्पन्न मिळत नसल्याने मीनाबाई यांनी दाढ, आश्वी परिसरात शेतमजुरी करून संसाराचा गाडा चालवला. अशिक्षित असूनही त्यांनी मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले.

तिन्ही भावांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कांगणवाडी येथे प्राथमिक शिक्षण घेतले. त्यानंतर सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात माध्यमिक विद्यालय, खळी येथे दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी दररोज चार किलोमीटर पायी प्रवास केला.

पुढे प्रवरा शिक्षण संस्थेच्या अश्वी येथील महाविद्यालयात शिक्षण घेत असताना सुट्टीच्या दिवशी शेतीकाम, मका कुट्टी आदी मजुरीची कामे करून शिक्षण सुरू ठेवले.

मोठा भाऊ अभिषेक घुगे याची वयाच्या १९ वर्षे ६ महिन्यांत २०२४ मध्ये भारतीय सैन्य दलात निवड झाली. त्यानंतर ऋषिकेश घुगे याची २०२५ मध्ये तर तेजस घुगे याची २०२६ मध्ये सैन्य दलात भरती झाली. भरती प्रक्रियेदरम्यान अनेकदा दोन-दोन दिवस उपाशी राहून मंदिरात मुक्काम करत त्यांनी प्रयत्न सुरू ठेवले.या प्रवासात चुलते दिवाणजी साहेबराव घुगे, आजोबा तुकाराम सोसे तसेच नातेवाईक व मित्रपरिवाराने मोठे सहकार्य केले. प्रवरा शिक्षण संस्था लोणी येथे उपलब्ध मोफत प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाचाही त्यांना लाभ झाला.मेहनत करा, व्यसनांपासून दूर राहा आणि प्रामाणिक प्रयत्न करा, यश नक्की मिळते, असा संदेश तिन्ही भावांनी युवकांना दिला. घुगे बंधूंच्या यशामुळे गावकऱ्यांनी कुटुंबाचा सत्कार करत आनंद व्यक्त केला.

## जाहीर सूचनापत्र

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार (फक्त सभासदांकरीता)

अकोले तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्या. अकोले ता. अकोले जि. अहिल्यानगर या सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांना या सुचनापत्राव्दारे सुचित करणेत येते की, आपल्या संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण कारागिर प्रतिनिधी या मतदार संघातील एक नैमित्तिक रिक्त पदाच्या जागेचे निवडीकरीता प्राधिकृत / अध्यासी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि.२९/०५/२०२६ रोजी दु.०१:०० वाजता संस्थेचे कार्यालय, शनि मंदिराचे पाठीमागे, अकोले याठिकाणी संचालक मंडळ सभा आयोजित करणेत येत आहे. सदर विशेष सभेस सन्माननीय संचालकांसह इच्छुक सभासदाने आधारकार्ड व फोटोसह वेळेवर उपस्थित रहावे.

ठिकाण :- अकोले जि. अ.नगर
दिनांक :- २२/०५/२०२६

सही/-
अध्यासी अधिकारी
अकोले तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्या. अकोले, ता.अकोले, जि.अहिल्यानगर

## जाहीर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/६६/२०२६
नेवासा दिनांक. ०५/०५/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-यासिन सरदार शेख रा. देवगांव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. यासिन सरदार शेख, रा. देवगांव यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे. अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-यासिन सरदार शेख, गावाचे नाव-देवगांव, जन्म दिनांक-२०/१२/१९६५. करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### तापमानात वाढ होत असताना राज्यात पावसाची हजेरी

देखील पावसाची दमदार बॅटिंग सुरु आहे. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे.सातारा जिल्ह्यातील दुष्काळी खंडाळा तालुक्याच्या पश्चिम भागात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावत कण्हेरी परिसराला अक्षरशः झोडपून काढलं. वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि ढगफुटी सदृश्य पावसामुळे ओढे दुथडी भरून वाहू लागले...दरम्यान, अतिट गावात वीज पडून एका गायीचा जागीच मृत्यू झाला असून शेतकरी रामदास जाधव यांचे मोठे नुकसान झाले आहे... तर कण्हेरी परिसरातील वीटभट्ट्यांवरील कच्च्या विटा भिजल्याने सुमारे पंधरा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे... खंडाळा तालुक्यातील असवली, कण्हेरी, लोहोम, कर्नवडी, घाडगेवाडी, अतिट, कवठे आणि जवळे परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी अचानक आलेल्या या पावसामुळे शेतकरी आणि वीटभट्टी चालक अडचणीत आले आहेत.. रत्नागिरी जिल्ह्यातही पावसाने हजेरी लावली आहे. चिपळूणमध्ये मान्सूनपूर्व सरी बरसल्या आहेत. विजांच्या कडकडाटसह चिपळूणमध्ये पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. उन्हाच्या तीव्रतेने हैराण झालेल्या नागरिकांना उकड्यापासून दिलासा मिळाला आहे. चिपळूणसह खेड गुहागर मध्येही काही भागात पावसाच्या सरी बरसल्या.

### पेट्रोल डिझेल साठी लांबच लांब रांगा!

घेता अत्यावश्यक सेवांसाठी इंधन राखीव ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पेट्रोल कंपन्यांसोबत प्रशासनाची देखील बैठक घेण्यात येत आहे. लवकरच इंधन पुरवठा सुरळीत होणार असल्याचा दावा प्रशासनाने केला असून अफवांवर विश्वास न ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांकडून आवाहन करण्यात आले आहे.

### बेलापूर यात्रेमध्ये दोन गटात सशस्त्र धुमश्चक्री

घडला. यात्रेतील पाळणे फुकट वापरू द्या, अशी एका गटाने मागणी केली होती. यावरून जोरदार वादाची ठिणगी पडली. याचे पर्यावसान दोन गटातील तुंबळ हाणामारी होऊन बेदम कुटाकूटीचा धक्कादायक प्रकार घडला. त्यावेळीला पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला असता, तर पुढील धुमश्चक्री टळली असती. मात्र पोलिसांचे साफ दुर्लक्ष केल्याने दोन गटातील वादाचे रूपांतर धुमश्चक्रीत झाले. त्यामुळे पोलिसांदेखत एकमेकांविरुद्ध हत्यारे उपसन्यात असल्याची चर्चा गावात सुरू आहे. त्यावेळी कट्टे काढून धाक दाखविण्यात आला. असा गंभीर प्रकार घडूनही पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली. गावातील काही सूज्ञ नागरिकांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना याबाबत अवगत केल्यानंतर श्रीरामपूर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांना बेलापूरला पाठविले होते. यानंतर घटनेतील सहभागी व्यक्तींना पोलीस चौकीवर बोलविण्यात आले. तेथेही या दोन गटात पोलिसांसमोर पुन्हा चांगलीच वादावादी झाली. यावेळी 'एका' गटात मात्र श्रीरामपूरातील गंभीर गुन्ह्यातील आरोपी हजर असल्याची चर्चा सुरू आहेत. या दरम्यान, पोलिसांनाच दमदाटी करण्यात आल्याची जोरदार चर्चा परिसरात सुरू आहे. गेल्या काही दिवसापासून पोलीस प्रशासनाचा धाक नसल्याने बेलापूर व परिसरात गुन्हेगार व अवैध धंद्याचा सुळसुळाट झाला आहेत.

अवैध धंदे चालकांना पाठबळ... जुगार, सोरट बिंगो बेकायदा वाळू उपसा आदीसह दोन नंबरच्या धंद्याना व त्यातील व्यक्तींना पाठबळ मिळत असल्याचे बोलले जाते. याबाबत कोणताही गुन्हा अद्याप दाखल नसल्याने शंका उपस्थित केली जात आहेत. हा धक्कादायक प्रकार रात्रीवेळी घडल्याने काही ग्रामस्थांना अजूनही माहिती मिळाली नाही. रात्री साडे दहा वाजेच्या दरम्यान दोन्ही गटातील पोलीस चौकीसमोर शंभरहून अधिक युवक जमले होते.

सीसिटिव्ही कॅमेरे तपासा! दोन गटातील मारामारी झाल्यावर त्यावेळी गावठी कट्याचा धाक दाखविण्याचा धक्कादायक प्रकार एकमेकांविरुद्ध गुंडप्रवृत्तीच्या लोकांनी प्रताप केला होता.घटनेवेळीचा बेलापूर पोलीस स्टेशनच्या सीसिटिव्ही कॅमेऱ्यात व्हिडिओ फुटेज कैद झाल्याचे सागितले जाते.याबाबत काही पुरावे उपलब्ध नसतील तर, प्रशासनाबाबत शंका उपस्थित होण्याची चिन्हे आहेत.

तरी, गुन्हा दाखल नाही मात्र घटनेदरम्यान,वाळूतस्करी करणारे पंटर, इतर, अट्टल गुन्हेगार घटनास्थळी हजर असताना चर्चेचे रुंपातर मारहाणीत झाले.मात्र गावात मोठी टोळीयुद्ध पेटले असताना पोलीसांनी कोणताही गुन्हा दाखल न केल्याने शंकेची सूई पोलिसांकडे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### गर्भलिंग निदान प्रकरणात आणखी दोघांना अटक

व सागर शांताराम उल्हाळे (वय २५, रा. नांदूर मधमेश्वर, निफाड) यांचा समावेश आहे. डॉ. वल्टे यांचा करंजगाव येथे दवाखाना असून त्यांनी आरोपी ठाकरेयाच्याकडून सोनोग्राफी मशीन घेतल्याची माहिती तपासात समोर आली आहे. तर उल्हाळे यांच्या ब्लड टेस्टिंग लॅबमध्ये संबंधित मशीन ठेवण्यात आल्याचेही उघड झाले आहे. दोघांना राहाता न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात यापूर्वी नेवासा येथील डॉ. भणगे, दोन एजंट आणि सहा कुटुंबीय अशा नऊ जणांना अटक करण्यात आली होती. आरोपींकडून एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन आणि तीन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली होती. पुढील तपासात ढगे नामक आरोपीकडून आणखी एक पोर्टेबल मशीन जप्त करण्यात आले. दरम्यान, श्रीरामपूर येथील डॉ. रविंद्र कुटे व माजी होमगार्ड समादेशक डॉ. राज शेख यांनाही अवैध गर्भलिंग निदान आणि गर्भपात प्रकरणात अटक करण्यात आली आहे. तसेच पुणे येथील दोन डॉक्टर आणि मशीन विक्री करणाऱ्या एका व्यक्तीलाही पोलिसांनी यापूर्वी अटक केली होती. पोलिसांनी आतापर्यंत या गुन्ह्यात वापरण्यात आलेली चार सोनोग्राफी मशीन आणि तीन चारचाकी वाहने जप्त केली आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती व सहाय्यक पोलीस निरीक्षक आठरे करत आहेत.

### युवा शक्तीला कोणीही कमी लेखू नका

राज्यकर्ते म्हणून आम्ही या आंदोलनामागील मूळ प्रश्न समजून घेतले पाहिजेत. केवळ दुर्लक्ष करून चालणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. देशाच्या आर्थिक प्रगतीचाही उल्लेख करताना कोल्हे म्हणाले, भारत आज जगातील १३व्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेतून चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे. देश आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करत असताना काही शक्ती या प्रगतीला खिळ घालण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील जबाबदार व्यक्तींनी विधाने करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अन् सहा वर्षांचा संकल्प अखेर पूर्ण दरम्यान, प्रसारमाध्यमांशी बोलताना विवेक कोल्हे भावूक झाल्याचे दिसून आले. कट्टर समर्थक वासुदेव शिंदे यांच्या संकल्पाचा विशेष उल्लेख केला.सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कोल्हे परिवाराचा निसटता पराभव झाल्यानंतर व्यथित झालेल्या वासुदेव शिंदे यांनी कोल्हे परिवारातील सदस्य आमदार होईपर्यंत पायात चप्पल घालणार नाही,असा संकल्प केला होता.गेल्या सहा वर्षे त्यांनी ऊन, वारा, आणि पावसातही अनवाणी राहून हा संकल्प पाळला आहे.

### जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयास मंजुरी

अहिल्यानगरच्या प्रशासकीय कारभाराचे केंद्र म्हणून शिर्डी अधिक सक्षम होत असल्याचे मानले जात आहे. यापूर्वी अपर जिल्हाधिकारी कार्यालय, विमानतळ, एमआयडीसी, लॉजिस्टिक पार्क तसेच संरक्षण क्षेत्राशी संबंधित मोठे प्रकल्प शिर्डीत आले आहेत. आता भूमी अभिलेख कार्यालयाच्या मंजुरीमुळे भविष्यात स्वतंत्र जिल्हा निर्मितीसाठी शिर्डीची दावेदारी अधिक मजबूत झाल्याची चर्चा राजकीय व प्रशासकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# वनविभागाने अनाधिकृत लाकूड वाहतूक करणारे दोन पिकअप पकडले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

संगमनेर : संगमनेर तालुक्यातील निमोण परिसरातून विनापरवाना वृक्षतोड करून बेकायदेशीररीत्या लाकूड वाहतूक केली जात असल्याची गुप्त माहिती वनविभागाला मिळाल्यानंतर संगमनेर वनविभागाने सापळा रचत मोठी कारवाई केली. या कारवाईत दोन पिकअप वाहने ताब्यात घेण्यात आली असून २ लाकूड व्यावसायिकां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संगमनेर तालुक्यातील निमोण येथून अनधिकृत लाकूड वाहतूक करणाऱ्या दोन पिकअप येत असल्याची माहिती अहिल्यानगर येथील उपवनसंरक्षक तसेच विभागीय वन अधिकारी (दक्षता) नाशिक यांना गुप्त माहिती मिळाली त्यांनी तात्काळ सहाय्यक वनसंरक्षक अमरजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती नम्रता हिरे यांच्यासह वनपाल वाय. आर. परते, तसेच वनरक्षक एस. एम. पारधी यांच्या पथकाने घुलेवाडी फाटा येथे सापळा







रचला, त्याच दरम्यान निमोन वरून संगमनेरकडे महिंद्रा कंपनीची पिकअप क्रमांक चक-१५ इग हीच वनविभागाच्या पथकाने अडविले असता या पिकअपमध्ये निमोनचा लाकूड व्यापारी फैजान इस्माईल अत्तार, तसेच दुसरे महिंद्रा पिकअप वाहन क्रमांक चक-१५ इग १५५३ यामध्ये इस्तीयाक मुस्ताक अत्तार बसलेले होते त्यांच्याकडे वनविभाग अधिकार्यांनी चौकशी करत त्यांच्या कडे लाकूड वाहतूक परवाना आहे का याची विचारणा केली असता त्यांच्याकडे कोणतेही वैध कागदपत्र नसल्याचे तपासणीत उघड झाली त्यानंतर वनाधिकाऱ्यांनी त्या दोघांवर गुन्हा दाखल करून दोन्ही लाकडांनी भरलेली पिकअप वाहने ताब्यात घेतली या प्रकरणाचा तपास संगमनेर भाग-२ च्या वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीमती नम्रता हिरे यांच्या मार्गदर्शना खाली सुरू असून चौकशी अधिकारी अधिक तपास करत आहेत. संगमनेर वनविभागाच्या या धडक कारवाईमुळे अवैध वृक्षतोड व लाकूड तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पर्यावरण संरक्षणासाठी वन विभागाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असल्याचे चित्र या कारवाईवरून दिसून येत आहे.

## नेवासा येथील बंधाऱ्याच्या पाण्याचे आ. लंघे यांच्या हस्ते जलपूजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** येथील प्रवरा नदी पात्रातील मध्यमेश्वर बंधाऱ्यात आलेल्या पाण्याचे जलपूजन शेतकऱ्यांच्या उपस्थितीत आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.वेळेवर बंधाऱ्यात पाणी सोडून दिलेला शब्द पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाळल्याने शेतकरी वर्गात समाधान व्यक्त करण्यात आले.

शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करून बंधारा भरून देण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतीला मोठा दिलासा मिळाला आहे



यावेळी झालेल्या जलपूजन कार्यक्रम प्रसंगी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील,भाजपचे तालुकाध्यक्ष प्रतापदादा चिंधे,नगरसेवक महेश लोखंडे, अंकुश म्हस्के,प्रविण सरोदे,कृष्णा परदेशी,संदीप सरकाळे,अनिल पवार, अनिल हापसे,पप्पू परदेशी, सतीश कर्डिले,आदिनाथ पटारे,अंबादास रोडे, अमित मापारी,दीपक धनगे,राम कदम,दीपक शिंदे,राजेंद्र चौधरी, गणेश सोनवणे,अनिल सोनवणे,कृष्णा डहाळे, पप्पू देशमुख,सचिन भांड, पोतदार यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ३३ वर्षीय युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गंगापूर** : तालुक्यातील मेंढी येथील ३३ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार गंगापूर तालुक्यातील सतीश सोपान भोसले (वय ३३, रा. मेंढी) यांनी २१ व २२ मेच्या मध्यरात्री घरात कोणी नसल्याचा फायदा घेत पत्र्याच्या अँगलला दोरी बांधून गळफास घेतला. त्यावेळी त्यांची आई व भाऊ गावाला गेले होते.

२२ मे रोजी सकाळी शेजाऱ्यांनी सतीश यांना घरात फासावर लटकलेल्या अवस्थेत पाहिले. त्यांनी तातडीने दार उघडून त्यांना खाली उतरवले व सागर शेजुळ यांनी रुग्णवाहिकेतून गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्यास मृत घोषित केले. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून तपास पोहेकॉ विजय पाखरे करत आहेत.

## जनगणना कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष द्या : शिक्षक सेनेची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : देशाच्या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय कार्यामध्ये समाविष्ट असलेल्या जनगणना प्रक्रियेदरम्यान कर्मचाऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेत्तर सेनेच्या वतीने प्रशिक्षणार्थी तहसीलदार सागर वाघमारे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




सध्या तालुक्यात जनगणनेचे काम युद्धपातळीवर सुरू असून अनेक ठिकाणी प्रगणकांवर अतिरिक्त कामाचा ताण येत आहे. विशेषतः २०० पेक्षा अधिक कुटुंबसंख्या असलेल्या भागांमध्ये एका प्रगणकावर मोठी जबाबदारी येत असल्याने अशा ठिकाणी अतिरिक्त प्रगणकांची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जनगणना कर्मचारी विविध गावांमध्ये सतत प्रवास करत असल्याने त्यांना पेट्रोल व डिझेल अत्यावश्यक सेवेमधून प्राधान्याने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने पेट्रोल पंप चालकांना सूचना द्याव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच अनेक कर्मचाऱ्यांना अधिकृत ओळखपत्र व जनगणना कीट अद्याप मिळाले नसल्याने कामात अडचणी येत असून ते तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान,बोलेगाव येथे जनगणनेचे काम करताना प्रगणक संदीप साळवे यांना कुत्र्याने चावा घेतल्याची घटना घडली. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत व महसूल प्रशासनाने जनजागृती करून कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

मयाशिवाय बीएलओ कर्मचाऱ्यांचे थकीत मानधन तातडीने त्यांच्या खात्यात जमा करावे, अशी मागणी शिक्षक सेनेने केली आहे. यावेळी शिक्षक सेनेचे मराठवाडा उपाध्यक्ष अनिल काळे, जिल्हा सरचिटणीस भगवान हिवाळे, तालुकाध्यक्ष राजेंद्र बोल्डे, जावेद पटेल, निलेश कहाटे, सचिन साळुंके, उद्धव बोचरे, कैलास गायके व योगेश दांगुर्डे उपस्थित होते.



## राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी कल्याण गायकवाड

**गंगापूर** : राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या (अजित पवार गटाच्या गंगापूर तालुकाध्यक्षपदी गळनिंब येथील कल्याण गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते त्यांना नुकते च नियुक्तीपत्र देण्यात आले. असुन पक्षाचे ध्येयधोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहचवून गंगापूर तालुक्यात पक्ष संघटन प्रभावी व मजबूत करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन करत आमदार सतीश चव्हाण यांनी कल्याण गायकवाड यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे. यावेळी गंगापूर नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष संजय जाधव, प्रदेश सरचिटणीस दिलीप बनकर, रामेश्वर चव्हाण, संतोष गायकवाड आदींची उपस्थिती होती.

## मंजूर सोलार पंप शेतकऱ्यांना तत्काळ मिळावे, मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** :तालुक्यातील शेतकऱ्यांना 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी / सोलर योजना' अंतर्गत मंजूर सोलर पंप त्वरित मिळावे तसेच एजन्सीकडून तात्काळ दुरुस्ती व देखभाल (मेंटेनन्स) सेवा मिळून प्रशासकीय विलंबामुळे झालेल्या शेतकरी नुकसानीची भरपाई देण्यात यावी यासह आदी मागण्यांसाठी शेतकरी गंगापूर येथील महावितरण कार्यालयासमोर उपोषण सुरू करताच उपकार्यकारी अभियंता यांनी लेखी आश्वासन देत उपोषण सोडण्यात आले.

गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या महावितरण व सोलर एजन्सी ढिसाळ, मनमानी, बेजबाबदार कारभारामुळे गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असुन अनेक शेतकऱ्यांनी मागेल त्याला सोलार पंप मिळावे म्हणून ९-९ महिने झाले मात्र अद्यापही सोलार पंम्प मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे.

विषेश म्हणजे शेतकऱ्यांनी ज्या अधिकृत कंपनीची निवड केली आहे, ती कंपनी सोडून इतर दुसऱ्याच कंपनीचे साहित्य माथे मारल्या जात आहे.ज्या शेतकऱ्यांचे सोलार बसविण्यात आले त्याची देखभाल दुरुस्ती केली जात नसल्याने शेतकऱ्यांना पिकांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने पाण्या अभावी पिके वाळले असुन मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.ज्या शेतकऱ्यांचे सोलार पंप मंजूर आहे. त्यांना सोलार पंप वेळेवर न बसविण्यात आल्याने शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी यासह आदी मागण्यांसाठी शेतकरी पंढरीनाथ पवार , भाजप युवा मोर्चाचे वाल्मीक पवार यांच्यासह आदींनी उपोषण सुरू करताच उपकार्यकारी अभीयंता यांनी लेखी आश्वासन देत उपोषण सोडण्यात आले यावेळी शेतकरी उपस्थित होते.



## खरीप हंगामासाठी युरिया खताचा मुबलक साठा उपलब्ध

**श्रीरामपूर** : खरीप हंगामात दरवर्षी युरिया खताची टंचाई निर्माण होत असल्याने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर बफर साठा उपलब्ध करून द्यावा, तसेच पेरणीपूर्वी कृषी केंद्रांमध्ये विक्रीसाठी येणाऱ्या बियाण्यांची गुणवत्ता तपासावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी जवरे यांनी जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. जवरे यांनी दिलेल्या निवेदनात खत कंपन्यांकडून शेतकऱ्यांच्या मागणीशिवाय विविध ग्रेडची खते बाजारात आणली जात असल्याचे नमूद केले आहे. या खतांना शेतकऱ्यांकडून प्रतिसाद नसल्याने ती कृषी विक्रेत्यांकडे पडून राहत असून त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच युरिया खताची मागणी केल्यास इतर खतांची सक्ती केली जात असल्याने विक्रेते युरियाची खरेदी टाळत असल्याचेही त्यांनी सांगितले. यावर बोलताना जिल्हा कृषी अधीक्षक सुधाकर बोराळे यांनी चालू खरीप हंगामासाठी जिल्ह्यात ६०१९.२३ मे.टन युरिया व ७५० मे.टन डीएपी खताचा बफर साठा तालुकानिहाय उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली. दरम्यान, युरिया व डीएपी खतासोबत इतर खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये किंवा जैव उत्पादने लिंकिंग करू नयेत, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांना खत देताना टाळाटाळ झाल्यास त्यांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० किंवा व्हॉट्सॲप क्रमांक ९८२२४४६६५५ वर तक्रार करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

**CHANGE IN NAME**

Old name: KHAN NAZEMABEGAM HAMIDKHAN IS ON MY SCHOOL LIVING CERTIFICATE. and My New Name is NAZEMA ALTAF PATHAN as on Aadhar Card Number is 6848 4594 7647 (21/05/2026)

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME NAJMABI BINTE ISMAIL PATHAN ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS NAJMABI BADURKHAN PATHAN (AADHAR NO. 9403 54497348) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC RAHATA PLACE: RAHATA DATE : 22/05/2026

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि .२३ मे २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० ६७० ३३७ | ३-५ | २३० २५८ १२२ | जोड ३६-७५-८१-२९-५४ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२३ १६९ ११४ | ६-२ | १५६ १२९ ११० | जोड ६०-३२-४१-५७-२९ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२५ २६० ४४० | ८-१ | १२८ २९० २२७ | जोड ८६-२१-५३-४९-१० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## निधन वार्ता

### सखाराम शेळके



**नेवासा** : तालुक्यातील बाभूळवेढा येथील रहिवासी व नेवासा पंचायत समितीत शिक्षण विभागात कार्यरत असलेले अधिकारी सखाराम उर्फ बाळासाहेब रामभाऊ शेळके (वय ५७) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, दोन भाऊ असा परिवार आहे. बाभुळवेडा येथील संजय व राजेंद्र शेळके यांचे बंधू तसेच डॉ. मोहन कुटे यांचे जावई, शेतकरी नेते पी.आर. जाधव यांचे मेव्हणे, माजी मंत्री शंकरराव गडाख यांचे स्वीय सहायक सुनील जाधव व अनिल जाधव यांचे ते मामा होते.

### कस्तुराबाई सूर्यवंशी



**शिर्डी:**येथील कस्तुराबाई गोविंद सूर्यवंशी यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुली व एक मुलगा असून त्या शिर्डी येथील आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक सूर्यवंशी यांच्या त्या मातोश्री होत्या.

### मैनाबाई निकाळे



**शिर्डी** : राहाता येथील मैनाबाई राधुजी निकाळे यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांचे पश्चात पाच मुले ,दोन जावई, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या रयतचे निवृत प्राध्यापक राजेंद्र निकाळे, राहाता नगर परिषद चे माजी नगराध्यक्ष धनंजय निकाळे तसेच विदयमान नगरसेवक भिमराज निकाळे यांच्या मातोश्री होत्या.

### जनार्दन जंगले



**पानेगांव** येथील दशरथभाऊ नावाने परिचित असणारे प्रगतिशील शेतकरी जनार्दन नाथू जंगले.यांचे दि.१९ मंगळवार रोजी अल्पशा निधन झाले (वय-७३) त्यांच्या पश्चात सहा मुले, दोन भाऊ सुना, जावई, नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. पानेगांव संस्थेचे उपाध्यक्ष रखमाजी जंगले व पानेगांव ग्रामपंचायत सदस्य नारायण जंगले यांचे बंधू व कोपरगांव येथील संजिवनी डिस्टलरीचे मॅनेजर पदावर कार्यरत राधाकृष्ण जंगले यांचे वडील होत.

### प्रकाश बारस्कर



**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील कमालपूर येथील प्रगतशील शेतकरी प्रकाश परभत बारस्कर ( वय ६९) यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुली ,एक मुलगा,सुन, नातवंडे असा परिवार असून रविंद्र बारस्कर यांचे ते वडील होत.

### प्रकाश दारकुंडे



**सोनई** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील जेष्ठ पत्रकार प्रकाश शंकरराव दारकुंडे वय (७५) यांचे नुकतेच निधन झाले. दै. गावकरी पासुन पत्रकारीतेस त्यांनी सुरुवात केली. लोकमत, सार्वमत, केसरी , पुण्यनगरी मधे त्यांनी पत्रकारीता केली. त्यांच्या पश्चात आई,एक भाऊ,दोन मुले,तीन बहिणी,सुना ,नातवंडे, असा परिवार आहे.सुरेश दारकुंडे यांचे ते जेष्ठ बंधू होत.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

द•ख•ल

## ज्यादा परताव्याच्या आमिषाने ९ लाखाची फसवणूक

**अहिल्यानगर :** विविध कंपन्यांच्या योजनांमध्ये गुंतवणूक करून अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवून एकाची तब्बल पावणे नऊ लाखाची फसवणूक केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी सारसनगर येथील एका संशयित विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, संशयित ऋषभ पारस बोरा (रा. सारसनगर) याने तक्रारदार कुटुंबाचा पूर्ण विश्वास संपादन करून विविध कंपन्यांमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परतावा मिळवून देण्याचे अमिष दिले होते. या आमिषाला बळी पडून तक्रारदारांनी वेळोवेळी संशयित आरोपीकडे ८ लाख ७१ हजार ३१६ रुपयांची मोठी रक्कम सोपवली होती. मात्र मुदत संपवून संशयिताने कुठल्याही प्रकारच्या परतावा अथवा मुद्दल रक्कम परत न करता चालढकल करण्यास सुरुवात केली. यावेळी आपली फसवणूक झाल्याचे पीडित. कुटुंबीयांच्या लक्षात आले. याबाबत त्यांनी पोलिसांकडे रीतसर तक्रार अर्ज दाखल केला. या तक्रार अर्जाच्या चौकशीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी संशयित ऋषभ बोरा याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## आलमगीर येथे जुन्या वादातून बाप-लेकावर शस्त्राने हल्ला; सात जणांवर गुन्हा

**अहिल्यानगर :** भिंगार येथील कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या आलमगीर परिसरातील बिलाल पार्क येथे काल रात्री किरकोळ कारणावरून आणि जुन्या वादातून एका तरुणाला व त्याच्या वडिलांना बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सात जणांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समीर रज्जाक पठाण यांनी या संदर्भात पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मुजाडीव रईस सय्यद, माजिद रईस सय्यद, सलमान मेहबुब बेलदार, अमन मेहताब खान, शाहरुख शेख ऊर्फ रेवड्या, सर्फराज फय्याद सय्यद ऊर्फ छोटू आणि फैजान गुलाम दस्तगीर यांनी बेकायदेशीर टोळी जमवून फिर्यादीच्या मुलाला विनाकारण मारहाण करण्यास सुरुवात केली. मुलाला मारहाण होत असल्याचे पाहून वडील समीर पठाण हे जाब विचारण्यासाठी गेले असता, सर्व आरोपींनी संगनमत करून त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी आरोपींनी शिवीगाळ व जीवे मारण्याची दमदाटी करत धारदार शस्त्राने वार करून दोघांना गंभीर जखमी केले. या गोंधळात फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची साखळी कुठेतरी पडून गहाळ झाली आहे. जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून, त्यांच्या जबाबानुसार कॅम्प पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. सहायक पोलीस निरीक्षक मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शेख पुढील तपास करत आहेत.

## प्रतिबंधित सुगंधित तंबाखू जप्त साडेपाच लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**अहिल्यानगर :** शहरातील महेश टॉकिजच्या पाठीमागे असलेल्या जग्गी ट्रान्सपोर्टच्या पार्किंगमध्ये तोफखाना पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेली ५२ हजार ५०० रुपये किमतीची सुगंधित तंबाखू आणि वाहतुकीसाठी वापरलेला ५ लाख रुपयांचा टेम्पो असा एकूण ५ लाख ५२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल सुमित सदाशिव गवळी यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून चंदु पान (रा. धामणगाव, ता. आष्टी, जि. बीड) या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, सध्या पोलीस त्याचा शोध घेत आहेत. हा सर्व प्रतिबंधित माल मानवी आरोग्याला अत्यंत अपायकारक आणि घातक आहे, हे माहीत असूनही आरोपीने तो विक्रीच्या उद्देशाने मागवला होता. जग्गी ट्रान्सपोर्टच्या पार्किंगमध्ये एका पांढऱ्या रंगाच्या टेम्पोमधून या प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची वाहतूक केली जात होती. तोफखाना पोलिसांना याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन हा सर्व साठा ताब्यात घेतला. या कारवाईत पोलिसांनी गोण्यांमध्ये भरलेली चौरसिया सुगंधित तंबाखूची तब्बल १ हजार ५०० पाकिटे जप्त केली आहेत. तोफखाना पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल बापू गोरे या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## मल्हार चौकात किरकोळ कारणावरून वाद; फर्निचर व्यावसायिकाला दगडाने मारहाण

**अहिल्यानगर :** शहरातील मल्हार चौक परिसरात एका फर्निचर व्यावसायिकाला अनोळखी इसमाने किरकोळ कारणावरून बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आगरकरमळा येथील रहिवासी आणि फर्निचर व्यावसायिक भरत माऊजी पित्रोडा हे पहाटेच्या सुमारास दुचाकीवरून घरी जात होते. स्टेशन रोडवरील मल्हार चौकात आल्यानंतर एका अनोळखी इसमाने त्यांना विनाकारण अडवून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. भरत पित्रोडा यांनी या प्रकाराबाबत विचारणा केली असता, त्या इसमाचा राग अनावर झाला. त्याने जमिनीवर पडलेला दगड उचलून पित्रोडा यांच्या कानामागे आणि डोक्यात जोरात मारला. या हल्ल्यात पित्रोडा गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर आरोपीने फिर्यादीला पोलिसात न जाण्याची धमकी दिली आणि तो तेथून पसार झाला. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी भरत पित्रोडा यांच्या तक्रारीवरून अनोळखी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार मारहाण आणि दमदाटीचा गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी सोमवंशी या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## अधिकमास पर्वकाळानिमित्त कार्यक्रम

**अहिल्यानगर :** श्री स्वामी समर्थांच्या कृपाशीर्वादाने तसेच प.पू. मुकुंद महेश्वर करंदीकर ऊर्फ नाना यांच्या प्रेरणेतून अधिकमास पर्वकाळानिमित्त रविवारी दि. २४ मे २०२६ रोजी दिवसभर चालणाऱ्या श्री स्वामी समर्थ ७८४ स्तवन मंडल कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सकाळी ८.४५ ते सायंकाळी ७.०० या वेळेत होणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्यात स्वामी भक्तांसाठी सामूहिक स्तवन, प्रार्थना, दर्शन व महाप्रसादाचा लाभ होणार आहे. अधिकमास हा हिंदू धर्मामध्ये अत्यंत पुण्यदायी आणि आध्यात्मिक साधनेसाठी महत्त्वपूर्ण मानला जातो. या पवित्र पर्वकाळात श्री स्वामी समर्थांच्या नामस्मरणाने व स्तवनाने भक्तांच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा, मानसिक शांती आणि आध्यात्मिक समाधान लाभते, अशी श्रद्धा आहे. या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या ७८४ स्तवन मंडल कार्यक्रमात दिवसभर चार सत्रांमध्ये प्रत्येकी सात स्तवन मंडले पार पडणार असून एकूण ७८४ आवर्तनांचे सामूहिक पठण करण्यात येणार आहे.

# उपजिल्हाधिकारी, तहसीलदारांसह आधिकाऱ्याचा सायकल प्रवास !

## ‘नो व्हेईकल डे’ ला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत व पर्यावरण संरक्षणाच्या आवाहनाला तसेच राज्य शासनाच्या हरित उपक्रमांना प्रतिसाद देत अहिल्यानगर जिल्ह्यात शुक्रवारी नो व्हेईकल डे उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयासह विविध शासकीय कार्यालयांच्या परिसरात वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या कमी दिसून आली. अनेक अधिकारी व कर्मचारी सायकल, इलेक्ट्रिक वाहन, सार्वजनिक वाहतूक तसेच पायी कार्यालयात पोहोचले.

विशेष म्हणजे निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते,जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक सुरेश आघाव यांनी स्वतः सायकलवरून कार्यालयात येत तसेच उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, गौरी सावंत, तहसीलदार शोभा पुजारी, तहसीलदार संचेती यांनी पब्लिक ट्रान्सपोर्ट चा वापर करून नंतर कार्यालयात पायी चालत येत उपक्रमात सहभाग नोंदविला. त्यांच्या या कृतीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यालयात सायकल, इलेक्ट्रिक बाइक व पायी येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र राज्य शाखा अहिल्यानगर तसेच महसूल संघटनेच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. उद्या आपली गाडी घरीच थांबणार हा निर्धार करत कर्मचाऱ्यांनी इंधन बचतीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

यावेळी एक कर्मचारी – एक वृक्ष दत्तक ही संकल्पनाही मांडण्यात आली. आगामी पावसाळ्यात केवळ वृक्षारोपण न करता प्रत्येक कर्मचाऱ्याने लावलेले झाड जगविण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच शासकीय कार्यालय परिसर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

कर्मचाऱ्यांचा ताणतणाव कमी करण्यासाठी दर महिन्याला सायकल रॅली, ट्रेकिंग, योग, ध्यानधारणा व सुदर्शन क्रिया सत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

या उपक्रमाला मा. जिल्हाधिकारी, मा. अप्पर जिल्हाधिकारी, मा. निवासी उपजिल्हाधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी सक्रिय पाठिंबा दिला. वरिष्ठ अधिकारी स्वतः सहभागी झाल्याने कर्मचाऱ्यांनीही मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.

या प्रसंगी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष अशोक अलका सूर्यभान मासाळ, महिला जिल्हाध्यक्षा सौ. वंदना नेटके यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.



## तरुणीचा पाठलाग करुन विनयभंग करणारा गजाआड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** रात्रीच्या वेळी पिडीत हि मैत्रिणीला भेटुन ऍक्टिवा गाडीवर व्ही स्टार हॉटेल समोरील रोडवरुन घरी जात असतांना एका तरूणाने मोटार सायकलवरुन पाठलाग करुन हातवारे करुन व बोलुन लज्जा उत्पन होईल असे कृत्य करून तरूणीचा विनयभंग केला. त्यावेळी सदर पिडीतेने तिचे सोबत घडत असलेल्या प्रकाराचा तिच्या मोबाईलमध्ये व्हिडीओ तयार केला होता. या घटनेबाबत पिडीतेने व्हिडीओ इस्टग्रामवर व्हायरल करुन व्हिडोओ मधील इसमास कोणी ओळखत असेल तर त्याचे नाव कळवा असा मेसेज केला होता.

पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी या घटनेचे गांभिर्य लक्षात घेवुन तो व्हिडीओ मधील इसमास तात्काळ ताब्यात घेण्याबाबत, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक, यांना आदेश केले होते. पो.नि. स्थानिक गुन्हे शाखा, यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करुन सदर व्हिडीओ मधील इसमास तात्काळ ताब्यात घेण्याबाबत सुचना केल्या.

पथकाने अहिल्यानगर शहरात व्हिडीओ मधील आरोपीचे व्यवसाय कौशल्य व गुप्त बातमीदारामार्फत सदर इसमचा शोध घेतला असता बंटी उर्फ संकेत ससाणे रा. सिध्दार्थनगर अहिल्यानगर याला ताब्यात घेतले. या घटनेप्रमाणे ताब्यातील बंटी ससाणे याने अजुन एक घटना केल्याची तक्रार प्राप्त झाल्याने त्याच्या विरूद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल केले आहे. आरोपीस पुढील तपास कामी तोफखाना पोलीस स्टेशन येथे हजर केले. असुन पुढील तपास तोफखाना पोलीस ठाणे करीत आहे.

अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल महिलांच्या सुरक्षेबाबत झिरो टॉलरन्स धोरण राबवत आहे. महिलांनी अशा घटनांची माहिती तत्काळ ११२ या नंबर फोन करुन माहिती द्यावी. असे आवाहन करण्यात येत आहे.

# उजाड जमिनीला मिळणार नवजीवन

## रेन गेन बॅटरी’मधून २१ व्या शतकाची सदाहरित क्रांतीचा संकल्प

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील दोन लाखांहून अधिक हेक्टर उजाड, कोरडी आणि निर्जीव झालेली जमीन पुन्हा हिरवीगार करण्यासाठी जैवविविधता नेगेन्ट्रॉपी हरित क्रांती राबविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने मांडण्यात आला आहे. स्थानिक लोकविज्ञान, नैसर्गिक साधने आणि पावसाच्या पाण्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन यांच्या माध्यमातून ही क्रांती उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या मोहिमेमुळे फळांनी लगडलेली झाडे, पक्ष्यांचा किलबिलाट, फुलपाखरांचे नृत्य आणि समृद्ध परिसंस्था पुन्हा निर्माण होऊ शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



महाराष्ट्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असला तरी त्यातील बहुतांश पाणी वाहून जाते किंवा उन्हामुळे बाष्पीभवन होते. परिणामी जमिनीत पुरेशा प्रमाणात पाणी मुरत नाही आणि ओलाशय टिकत नाही. यामुळे जमीन कोरडी पडते, शेतीची उत्पादकता घटते, विहिरी कोरड्या होतात आणि जैवविविधतेचा ऱ्हास होतो. अनेक भागांत जमीन मृत प्रदेशासारखी दिसू लागल्याने पर्यावरणासह शेतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

या गंभीर समस्येवर उपाय म्हणून रेन गेन बॅटरी, बारमाही भूमिगत ओलाशय आणि जैवविविधतेवर आधारित वृक्षसंवर्धन निगेन्ट्रापी या तीन संकल्पना पुढे आणण्यात आल्या आहेत. प्रत्येक झाडाजवळ जमिनीखाली पावसाचे पाणी साठवून ठेवणारी विशेष नैसर्गिक रचना तयार करण्याची कल्पना मांडण्यात आली आहे. दगड, वाळू, झाडं मुरूम, आणि इतर नैसर्गिक घटकांचा वापर करून तयार होणाऱ्या या व्यवस्थेला भूमिगत पावसाची बॅटरी असे संबोधण्यात आले आहे.

पाऊस पडताच हे पाणी थेट जमिनीत साठवले जाते. त्यामुळे पाणी वाहून जात नाही किंवा उन्हामुळे वाफ बनून उडून जात नाही. हे पाणी हळूहळू जमिनीत मुरत राहते आणि झाडांच्या मुळांना बाराही महिने आवश्यक ओलावा पुरवते. एका पावसाळ्यात साठवलेले पाणी संपूर्ण वर्षभर झाडांना जगण्याची ओल पुरवठा देऊ शकते, असा दावा या मोहिमेच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

पूर्वी पावसाचे मोठे प्रमाण वाया जात असल्याने जमिनीत ओलावा टिकत नव्हता. त्यामुळे झाडांची वाढ खुंटत होती आणि शेतकऱ्याला स्थिर उत्पन्न मिळत नव्हते. मात्र रेन गेन बॅटरी पद्धतीमुळे पाणी मोठ्या प्रमाणावर जमिनीत मुरेल, भूमिगत ओलावा टिकून राहील आणि झाडांच्या जगण्याची क्षमता वाढेल. यामुळे फळझाडे, औषधी वनस्पती, सावली देणारी वृक्षराजी आणि जैवविविधतेला पोषक परिसंस्था निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या हरित मोहिमेमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अनेक स्रोतांमधून वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. फळबागांमधून वर्षभर उत्पन्न मिळू शकेल. मधमाशांच्या पालनातून शुद्ध मध उत्पादन होईल. गांडूळखतातून सेंद्रिय खत तयार करून त्याची विक्री करता येईल.

## तहसीलच्या दिरंगाई विरोधात राष्ट्रवादीचा ठिय्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** टाकळी खादगाव येथील सविता संजय पादीर व त्यांचे सासरे देवराम पादीर यांच्या मालकीच्या शेतजमिनीकडे जाणारा पारंपरिक रस्ता काही व्यक्तींनी बेकायदेशीररित्या अडवल्याचा प्रकरणी संबंधित कुटुंबाने तहसील दांराकडे कारवाईची मागणी केली होती. परंतु त्याची दखल न घेतल्याने अखेर राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश मोहन पोटे यांच्या सह तहसील कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले होते.



शेती हा उपजीविकेचा मुख्य आधार असताना शेतात जाण्यासाठीचा रस्ता बंद झाल्याने संबंधित कुटुंबाला मानसिक, आर्थिक व सामाजिक त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत सविता संजय पादीर यांनी जून २०२४ मध्ये अहिल्यानगर तहसील कार्यालयात लेखी तक्रार अर्ज दाखल करून रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली होती. मात्र, दीर्घ कालावधी उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नाही.

त्यानंतर दि. २७ मे २०२५ रोजी राज्याच्या महसूल मंत्र्यांकडेही लेखी तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत तब्बल सात महिन्यांनी, दि. ९ जानेवारी २०२६ रोजी नायब तहसीलदार गौरव दळवी यांनी टाकळी खादगाव येथे प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. त्यावेळी दोन ते चार दिवसांत प्रश्न मार्गी लावण्यात येईल, असे आश्वासन दिले होते.

मात्र, त्यानंतरही जवळपास पाच महिने उलटून गेले असून कोणतीही कार्यवाही झाली नाही. तहसील कार्यालयाच्या वारंवार चकरा मारूनही केवळ उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यानंतर कुटुंबाने सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश मोहन पोटे यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयासमोर आंदोलन सुरू केले.

# तडीपार सोनु बोरूडे जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातुन हद्दपार करण्यात आलेला सोनु उर्फ वैभव राजेंद्र बोरूडे रा. चिंचपुर ता. पाथर्डी हा हद्दपार असताना ही चिंचपुर येथे आढळून आला. या बाबत गुप्त बातमी दारा मार्फत माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याच्या विरूद्ध पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



जिल्हा पोलिस प्रमुख मुम्मका सुदर्शन, यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार सुरेश माळी, सुयोग सुपेकर, रोहित येमुल, सागर ससाणे यांचे पथक तयार करुन अहिल्यानगर जिल्ह्यातुन हद्दपार केलेल्या आरोपींची माहिती काढुन कारवाई करण्याबाबत सुचना करुन पथकास रवाना करण्यात आले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्हयातील हद्दपार करण्यात आलेल्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांचा पाथर्डी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये शोध घेत असतांना पथकास गुप्तबातमीदारामार्फत हद्दपार इसम सोनु उर्फ वैभव राजेंद्र बोरुडे रा.चिंचपुर ता. पाथर्डी हा हद्दपार आदेशाचा भंग करुन विनापरवाना चिंचपुर येथे घरी असल्याची माहिती प्राप्त झाली.

या माहितीचे आधारे पथकाने चिंचपुर ता. पाथर्डी येथे जावुन शोध घेतला असता एक इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेतले. सोनु उर्फ वैभव राजेंद्र बोरुडे असे त्याने नाव सांगितले. ताब्यातील इसमाचे हद्दपार अभिलेखाची खात्री करता त्याला दि. ५/१२/२०२५ पासुन २ वर्षाकरिता अहिल्यानगर जिल्ह्यामधुन हद्दपार केलेले आहे.

ही माहिती समजल्याने त्याला ताब्यात घेउन पाथर्डी पोलिस ठाण्यात पोकॉ सागर अशोक ससाणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पाथर्डी पोलीस स्टेशन करीत आहे.

# विजेच्या शट-डाऊनमुळे शहराचा पाणी पुरवठा एक दिवस विलंबाने

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शनिवार दि. २३ मे. रोजी वीज वितरण कंपनी कडून त्यांचे महत्वाच्या कामांसाठी घेण्यात येणाऱ्या शट डाउनमुळे शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा होणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

महावितरण कंपनीला ३३ के.व्ही मुळा डॅम वाहिनीवर पावसाळया आधीची देखभाल दरूस्ती आणि ग्राहकांची झळ बदलणेसाठी दि. २३ मे रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शट-डाऊन घेण्यात येणार आहे.

तसेच सदर शट-डाउन वेळेत अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील महत्वाची दुरूस्तीची कामे शनिवार दि. २३ मे रोजी सकाळी ११.०० ते सांय. ५.०० वाजेपर्यत करण्यात येणार आहे.

दरम्यान काळात मुळानगर, विळद, येथून होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार असल्याने शहर पाणी वितरणासाठीच्या टाक्या भरता येणार नाही.



त्यामुळे शनिवार दि. २३ मे रोजी बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सुर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर तसेच सारसनगर, बुरूडगाव रोड, केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर इ. भागास सकाळी ११.०० नंतरच्या पाणी वाटपाच्या भागास पाणी पुरवठा होऊ शकणार नाही. सदरचा पाणी पुरवठा हा रविवार दि.२४ मे रोजी करण्यात येईल.

तसेच रविवार दि.२४ मे रोजी रोटेशन नुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागात म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने महानगरपालिका कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी इत्यादी भागात महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार नाही, या भागातील पाणी पुरवठा हा रविवार ऐवजी सोमवार दि. २५ मे रोजी करण्यात येईल.

सोमवार दि.२५ मे रोजी पाणी पुरवठा होवू घातलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको, स्टेशन रोड, आगरकर मळा, विनायक नगर इत्यादी भागात पाणी पुरवठा होणार नसून तो मंगळवार दि. २६ मे रोजी करण्यात येईल.

शहरातील पाणी पुरवठा एक दिवस बंद करून उपनगरात ज्या भागात जास्त दिवसाचे रोटेशन आलेले आहे. अशा भागात पाणी पुरवठा करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. तरी नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करावा. असे आवाहन मनपा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

द • ख • ल

## पशुधन उद्योजकता योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया

**पुणे** : पशुसंवर्धन आयुक्तालय तर्फे राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने अंतर्गत ऑनलाइन अर्ज प्रक्रिया महाडीबीटी पोर्टलचे तांत्रिक काम पूर्ण होताच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देणे, पशुपालन व्यवसायाला आधुनिक उद्योजकतेचे स्वरूप देणे आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील युवक, शेतकरी आणि पशुपालकांमध्ये या योजनेबाबत मोठा उत्साह दिसून येत असून, योजनेची अंमलबजावणी वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी यासाठी पशुसंवर्धन विभागाने सूक्ष्म नियोजन सुरू केले आहे. लाभार्थ्यांना घरबसल्या अर्ज करता यावा यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यासाठी महाआयटी कडून विशेष पोर्टल विकसित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पोर्टलचे काम पूर्ण होताच योजना अधिकृतपणे सुरू झाल्याची घोषणा करण्यात येणार असल्याचे डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले. योजनेसंदर्भातील अधिकृत माहिती, मार्गदर्शन अथवा शंकानिरसनासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी टोल-फ्री क्रमांक १९६२ वर संपर्क साधावा, तसेच नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधून माहिती घ्यावी, असे आवाहनही पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

## अवकाळी पावसाचा तडाखा

**निरगुडसर** : पुणे-नाशिक महामार्ग परिसरात शुक्रवार (दि.२२) रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या अवकाळी मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. जोरदार वारे, विजांचा कडकडाट आणि अतिवृष्टीमुळे महामार्गालगतची अनेक मोठी झाडे रस्त्यावर कोसळल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. परिणामी महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून प्रवाशांना तासन्तास अडकून राहावे लागले. सतत सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्याच्या



दोन्ही बाजूंची गटारे तुंबून भरली होती. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी थेट रस्त्यावर आल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. विशेषतः दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांची मोठी गैरसोय झाली. काही ठिकाणी पाण्याचा वेग वाढल्याने नागरिकांना मार्ग काढणेही कठीण झाले होते. रम्यान, पावसासोबत झालेल्या विजांच्या कडकडाटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काही भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. अवकाळी पावसाच्या या अचानक तडाख्यामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाली. महामार्गावरील कोसळलेली झाडे तातडीने हटवून वाहतूक सुरळीत करावी तसेच तुंबलेली गटारे साफ करावीत, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली असून मदत व वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (PMIS) २०२६ – तिसरा टप्पा जाहीर

**पुणे** : केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (झचखड) २०२६ च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून देशभरात ३१,४८० पेक्षा अधिक इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. या योजनेंतर्गत उमेदवारांची पात्रता वय १८ ते २५ वर्षे, भारतीय नागरिकत्व आवश्यक, किमान १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा किंवा पदवीधर उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. पूर्णवेळ नोकरी किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र असतील. जे उमेदवार ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेत आहे ते उमेदवार पात्र आहेत. इंटर्नशिपचा कालावधी ६ ते ९ महिने असून दरमहा रु. ९,०००/- विद्यावेतन दिले जाणार आहे. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल. झचखड या योजनेमध्ये पुणे जिल्हयामधील महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. (२४०), बजाज ऑटो लि. (३०९), व्होक्सवॅगन इंडिया प्रा.लि (३), रिलायन्स इंडिस्ट्रीज लि. (३३), टेक महिंद्रा (२), बर्जर पेन्टस् इंडिया लि. (८), बीव्हीजी इंडिया लि. (२), एमक्युअर फार्मास्युटिकल्स लि. (२५), इमामी लि. (१५), फिनोलेक्स केबल्य लि. (५०) ई. नामांकित कंपनीमध्ये रिक्तपदांसाठी उमेदवारांना इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध आहे.

# नागरिकांना ऑनलाईन सेवा विहीत वेळेत उपलब्ध करुन द्याव्यात

## पुणे विभागाचे राज्य आयुक्त सुधाकर तेलंग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे**: महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अन्वये नागरिकांना ऑनलाईन सेवा विहीत वेळेमध्ये पारदर्शकपणे उपलब्ध करुन देण्यात याव्यात; या सेवा नागरिकांना घरपोच देण्याबाबत कार्यवाही करावी अशा सूचना राज्य लोकसेवा आयोगाच्या पुणे विभागाचे राज्य आयुक्त सुधाकर तेलंग यांनी दिल्या.

उपविभागीय अधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हणुमंत पाटील, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, तहसीलदार स्वप्नील रावडे, गट विकास अधिकारी किशोर माने, नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे,



आदी उपस्थित होते.

श्री. तेलंग म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना राज्यशासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबध्द पद्धतीने देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला आहे. त्यानुसार या कायद्यान्वये पुरविण्यात येणा-या सर्व सेवा सुविधांची प्रभावी अंमलबजावणी करावी. अधिनियमांच्या अनुषंगाने पारदर्शकता, उत्तरदायित्व, कालबध्द सेवा, कार्यक्षम सेवा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर व ई-प्रशासन संस्कृतीचा अवलंब करणे याबाबत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

बारामती तालुक्यामध्ये एकूण १४७ इतके महा ई-सेवा व आपले सरकार सेवा केंद्र आहेत. यापैकी किमान ५ आदर्श आपले सरकार सेवा ग्रामपंचायत व आपले सरकार सेवा केंद्र तयार करावेत. तसेच सर्व महा ई-सेवा व आपले सरकार केंद्रांकरिता सेवा-सुविधाबाबतचे प्रशिक्षण लवकरच आयोजित करणेत येईल, असेही श्री. तेलंग म्हणाले.

श्री. तेलंग यांनी मौजे माळेगाव बु. येथील महा ई-सेवा केंद्राची पाहणी केली. यावेळी तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

## प्रस्तावित देवस्थान इनाम निर्मूलन कायदा: कोणाला मिळणार खरा लाभ ?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सातारा** : सातारा येथील समर्थ सदन राजवाडा येथे नुकतीच सार्वजनिक देवस्थान ट्रस्ट फेडरेशन महाराष्ट्र राज्य (मुख्य कार्यालय सातारा) यांच्या वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. देवस्थान इनाम संदर्भात स्वतंत्र कायदा अंमलात आणण्याच्या सरकारच्या प्रस्तावित निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत, सर्व देवस्थान इनाम सनदधारक (वहिवाटदार), गुरव (पुजारी) आणि इतर परंपरा सेवा करणारे सेवेकरी उपस्थित होते. या बैठकीत अनेक गंभीर मुद्द्यांवर चर्चा झाली, ज्याचा केंद्रबिंदू होता प्रस्तावित कायद्याचा खरा उद्देश आणि त्याचे संभाव्य परिणाम.प्रस्तावित कायद्याचा उद्देश पुजारी, वतनदार, मिरासदार आणि कुळ यांना दिलासा देणे असा सांगितला जात असला, तरी या कायद्याचा प्रत्यक्षात लाभ कोणाला होणार, हा प्रश्न संघटनेचे अध्यक्ष विजय पोरे यांनी यावेळी उपस्थित केला आहे. शासनाने या संदर्भात संपूर्ण आणि पारदर्शक माहिती जनतेसमोर मांडणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांचे मत आहे. पारदर्शकतेची मागणी आणि श्वेतपत्रिकेची आवश्यकता विजय पोरे आणि त्यांच्या संघटनेने शासनाकडे काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे व मागणी केलेली आहे.

" देवस्थान इनाम जमिनींपैकी नेमक्या किती जमिनी पुजारी, वतनदार किंवा मिरासदार यांच्या प्रत्यक्ष ताब्यात आहेत? " किती जमिनी कुळांच्या ताब्यात आहेत? " किती जमिनी विक्री, हस्तांतरण किंवा बेकायदेशीर व्यवहारांडरे इतरांच्या ताब्यात गेल्या आहेत? " किती जमिनींवर अतिक्रमण झालेले आहे? " देवळातील देवतेचे आणि मठांचे अथवा अन्य हिंदू (जैन बौद्ध शीख ) अस्तापनांचे देवस्थान इनाम जमिनीवरील मालकी हक्क सुरक्षित करून, देवतेचे सेवाधारी अथवा पुजारी, वहिवाटदार यांचे परंपरागत वहिवाट हक्क सुरक्षित करून त्यांना पूर्ण कायदेशीर संरक्षण देणे.

या सर्व प्रश्नांची अधिकृत तपशील शासनाने जाहीर करणे आवश्यक आहे. केवळ इतकेच नाही, तर प्रत्येक जमिनीचे रेडी रेकनर मूल्य, सध्याचे बाजारमूल्य, तसेच संबंधित व्यक्ती किंवा संस्थांच्या ताब्याचा तपशील यांचा समावेश असलेली सविस्तर श्वेतपत्रिका (थहळींश झरशिॲ) प्रकाशित करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.या सभेसाठी संघटनेचे अध्यक्ष विजय पोरे यांच्यासह गुरव समाजातील अनेक ज्येष्ठ मार्गदर्शक व्यक्ती उपस्थित होत्या, ज्यांनी या गंभीर मुद्द्यावर एकजुटीने आवाज उचलला. हा कायदा खऱ्या अर्थाने कोणासाठी आहे, हे स्पष्ट होईपर्यंत यावर सखोल चर्चा आणि पारदर्शकता आवश्यक आहे.यावेळी संघटनेचे अध्यक्ष विजय पोरे, सचिव हणमंतराव क्षीरसागर, संदिप गुरव, नाना गुरव, शिवाजीराव साखरे,मधुकर गुरव, सोनबा गुरव, बंडोपंत गुरव, दत्तात्रय पुजारी,बाळासाहेब गुरव, धनंजय पाटील, विठ्ठलजी महाराज,विधीतज्ञ रवी क्षीरसागर, शामराव भांडवलकर, आप्पासाहेब गुरव, शरदराव गुरव ,विलास पोरे ,माधवराव गुरव, राजेंद्र गुरव,प्रकाश गुरव, जनार्दन गुरव, ॲड कदम, ॲड करपे व इ.समाज बांधव उपस्थित होते.

### केवळ घोषणा की खरा दिलासा?

अशा वस्तुनिष्ठ माहितीशिवाय, ''हा कायदा पुजारी, वतनदार, मिरासदार व कुळ यांच्या हितासाठी आहे'' हा दावा केवळ घोषणात्मक ठरतो, असे विजय पोरे यांचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात लाभ कोणाला मिळणार, देवस्थानांची किती संपत्ती खाजगी हातात जाणार आणि धार्मिक संस्थांचे किती नुकसान होणार, हे जनतेसमोर स्पष्ट होणे आवश्यक आहे.

---------------

### संशयाचे ढग आणि लोकशाहीची गरज

जर शासनाने ही माहिती सार्वजनिक केली नाही, तर या कायद्याच्या आडून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर ताबे, अतिक्रमणे, अवैध हस्तांतरणे किंवा प्रभावशाली घटकांचे हितसंबंध नियमित करण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर संशय निर्माण होतो. लोकशाही आणि सार्वजनिक विश्वासासाठी, कोणत्याही कायद्यापूर्वी शासनाने संपूर्ण माहिती सार्वजनिक करून पारदर्शकता राखणे ही मूलभूत गरज आहे.

## पूर्व आंबेगावात पावसाची जोरदार हजेरी

### विजेचा कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यासह वातावरणात गारवा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी** : पूर्व आंबेगाव तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांसह शेतकरी हैराण झाले होते. उन्हाच्या तीव्र उकाड्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना गुरुवारी सायंकाळी अचानक पावसाने जोरदार हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला.

विजेचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. तालुक्यातील अनेक भागांत ढगाळ वातावरण तयार होऊन काही वेळातच जोरदार पाऊस सुरू झाला. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची धावपळ उडाली. काही ठिकाणी वाऱ्याचा वेग अधिक असल्याने झाडांच्या फांद्या तुटून पडल्याच्या घटना घडल्या. विजांच्या कडकडाटामुळे



नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, या पावसामुळे उन्हाळी पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. वाढत्या उष्णतेमुळे भाजीपाला, मका, तसेच इतर उन्हाळी पिके करपत असल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र झालेल्या पावसामुळे पिकांना जीवनदान मिळाल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. अचानक झालेल्या पावसामुळे वातावरण आल्हाददायक बनले असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हवामानातील बदलामुळे आगामी काही दिवसांत आणखी पावसाची शक्यता वर्तवली जात आहे.

## आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात वादळी वाऱ्यासह पाऊस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर** : आंबेगाव तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांसह शेतकरी हैराण झाले होते. उन्हाच्या तीव्र उकाड्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना शुक्रवारी सायंकाळी अचानक पावसाने जोरदार हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला.

आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागात आणि गावांमध्ये विजेचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. पूर्व भागातील निरगुडसर पारगाव लाखनगाव जारकरवाडी परिसरात मुसळधार पाऊस झाला. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची धावपळ उडाली. काही ठिकाणी वाऱ्याचा वेग अधिक असल्याने झाडांच्या फांद्या तुटून पडल्याच्या घटना घडल्या. विजांच्या कडकडाटामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, या पावसामुळे उन्हाळी पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. वाढत्या उष्णतेमुळे भाजीपाला, मका, तसेच इतर उन्हाळी पिके करपत असल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र झालेल्या पावसामुळे पिकांना जीवनदान मिळाल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली अचानक झालेल्या पावसामुळे वातावरण आल्हाददायक बनले असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हवामानातील बदलामुळे आगामी काही दिवसांत आणखी पावसाची शक्यता वर्तवली जात आहे.



## लेखी आश्वासनानंतर फुलडाळे यांनी उपोषण सोडले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरूर** : शिरूर शहराच्या विविध भागात दिशादर्शक फलक लावावेत; तसेच शहरातील महत्वाच्या गल्लीबोळांना नावे देऊन तसे नामफलक लावावेत, या मागणीसाठी गेल्या पाच वर्षांपासून पत्रव्यवहार व पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याने सामाजिक कार्यकर्ते प्रीतेश फुलडाळे यांनी सोमवारी नगर परीषद मंगल कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. दरम्यान, या मागण्यांबाबत तातडीने अंमलबजावणी केली जाईल, असे लेखी आश्वासन नगर परिषदेने दिल्यानंतर फुलडाळे यांनी रात्री उशीरा उपोषण सोडले.

शिरूर शहर ही तीन तालुक्यांची बाजारपेठ असून, दिवसेंदिवस शहर व परिसरातील लोकसंख्या वाढत आहे. बाहेरगावचे लोक येथे वास्तव्यास असून, दैनंदीन कामांसाठी बाहेरगावच्या लोकांचा येथे रोज राबता असतो. नवीन लोकांना सरकारी दवाखाना, पोलिस ठाणे, तहसिलदार कार्यालयासह शासकीय कार्यालये, शाळा, कॉलेज, बसस्थानक, पोस्ट ऑफीस, अमरधाम, कब्रस्तान, दशक्रिया विधी घाट व धार्मिक स्थळांच्या ठिकाणी जाण्यासाठी अडचणी येतात. माहिती नसल्याने त्यांची कुचंबणा होते. त्यासाठी शहराच्या विविध भागात मार्गदर्शकपर दिशादर्शक फलक गरजेचे आहेत, असे फुलडाळे यांनी सांगितले. हे फलक लावावेत व शहरातील विविध चौक, रस्त्यांना दिलेल्या नावाच्या पाट्या जुन्या झाल्याने त्या बदलून नव्या लावाव्यात यासाठी नगर परिषदेकडे गेल्या पाच वर्षांपासून पत्रव्यवहार केला असून, त्याअनुषंगाने सातत्यपूर्ण पाठपुरावा देखील केला आहे. मात्र, पत्रांना साधे उत्तर सुद्धा नगर परिषद प्रशासनाकडून न मिळाल्याने या महत्वाच्या विषयाकडे लक्ष वेधण्यासाठी उपोषणाचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सायंकाळी उशीरा नगर परिषदेच्या बांधकाम समितीचे सभापती सुनील जाधव, स्वच्छता समितीचे सभापती एजाज बागवान, नगरसेवक सागर नरवडे व स्वप्नाली जामदार यांनी आंदोलक फुलडाळे यांच्याशी त्यांच्या मागण्यांबाबत चर्चा केली. नगर अभियंता एस. आर. मुंगसे यांनी, १२ मे ला झालेल्या सर्वसाधारण सभेत शहराच्या विविध भागात दिशादर्शक फलक लावण्याबाबतचा ठराव झाला असून, त्याबाबत लवकरच अंमलबजावणी केली जाईल, असे लेखी पत्र दिल्यानंतर फुलडाळे यांनी उपोषण सोडले.

## काठापुर येथे वन विभागाच्या हद्दीतून अनेक वृक्ष चोरी : वन विभागाचे दुर्लक्ष !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आंबेगाव** : तालुक्यातील काठापुर परिसरातील वन विभागाच्या हद्दीतून खैर, लिंब, बाभूळ तसेच बोर जातीचे अनेक मौल्यवान वृक्ष अज्ञात चोरट्यांनी तोडून लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वी शिंगवे परिसरात खैर जातीच्या वृक्षांची मोठ्या प्रमाणात चोरी झाल्याची घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा वनसंपदेवर डल्ला मारण्यात आल्याने वन विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित वनाधिकारी व कर्मचारी आपल्या बीटामध्ये प्रत्यक्ष वास्तव्यास राहत नसल्यामुळे जंगल परिसरात गस्त आणि देखरेख कमी झाली आहे.



बहुतांश कर्मचारी व अधिकारी शहरांच्या ठिकाणी राहत असल्याने जंगल भागाकडे दुर्लक्ष होत असून याचाच फायदा घेत चोरट्यांनी वृक्षतोडीचा धुमाकूळ घातल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. काठापुर परिसरात खैर, लिंब, बाभूळ तसेच बोर जातीचे अनेक वृक्ष तोडून नेण्यात आले असून या प्रकारामुळे लाखो रुपयांची वनसंपदा नष्ट झाली आहे. पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असतानाही वन विभागाकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. मात्र पत्रकारांनी माहिती विचारल्यानंतर संबंधित अधिकारी स्पष्ट माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याचेही समोर आले आहे. वारंवार होत असलेल्या वृक्ष चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी जंगल परिसरात नियमित गस्त वाढवावी, संबंधित अधिकाऱ्यांच्या कामकाजाची चौकशी करावी आणि आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## अधिक जेष्ठ मास निमित्त सोपानदेव मंदिरात हरीनाम सप्ताह

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस** : हिंदू धर्मात अधिक जेष्ठ महिन्याला विशेष महत्व आहे. अधिक महिना म्हणजे देवाची आराधना, व्रत, वैकल्य, आकंद हरीनाम सप्ताह या माध्यमातून देवाला प्रसन्न करून घेण्यासाठी उत्तम महिना आहे. यानिमित्त अनेक मंदिरात भक्ती आराधना पाहायला मिळत आहे. दरम्यान सासवडला संत सोपानदेव मंदिरात अखंड हरीनाम सप्ताहाची नुकतीच सांगता करण्यात आली. पुरंदर तालुका श्री शिरोमणी सोपानकाका वारकरी प्रासादिक ट्रस्टच्या वतीने सोपानदेव मंदिरात अधिक जेष्ठ मास निमित्त हरीनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी १८ रोजी सकाळी मान्यवरांच्या हस्ते वीणा आणि संत तुकाराम गाथा पूजन करून सोहळ्यास प्रारंभ झाला. संपूर्ण सोहळ्याच्या कालावधीत हभप आदित्य मोरे, हभप प्रकाश वेदपाठक, हभप सुमनताई वाईकर, हभप सीमा कापरे यांनी प्रवचन सेवा केली. तर हभप बबन महाराज चोरघे, हभप मंगेश महाराज कदम यांची कीर्तनसेवा पार पडली.

तसेच बुधवारी २० रोजी पहाटे काकडा आरती आणि संत सोपानदेव समाधीची महापूजा करण्यात आली जेष्ठ कीर्तनकार हभप साहेबराव महाराज पढेर (होळ मुरूम) यांनी काल्याचे कीर्तन झाल्यानंतर दहीहंडी फोडण्यात आली. त्यानंतर टाळ मृदुंगाच्या गजरात मंदिर प्रदक्षिणा होवून आरती घेण्यात आली. तसेच उपस्थितांना काल्याचा महाप्रसाद देण्यात येवून सोहळ्याची सांगता करण्यात आली. संत सोपानदेव देवस्थानचे मुख्य विश्वस्त एड त्रिगुण महाराज गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली हरीनाम सप्ताह पार पडला. यामध्ये मृदुंगवादक आदित्य उबाळे, आर्यन उबाळे तसेच शंकर म्हस्के, साहेबराव पढेर यांनी व्यासपीठ चालक म्हणून सेवा केली. यावेळी वारकरी ट्रस्टचे संस्थापक हभप रमेश महाराज उबाळे, अध्यक्ष हभप विजय अधिकारी, कार्याध्यक्षएकनाथ काळाने, उपाध्यक्ष दशरथ कादबाने, शामराव देवकर, सचिव काळूराम कड, खजिनदार शंकर म्हस्के, देवस्थानचे चोपदार सिद्धेश शिंदे, रोहिदास खैरे, मोहन उरसळ, हिम्मत चव्हाण,मनीषा नवले, सुमनताई वायकर, वंदना काकडे, बाळासो कड , शिवाजी काळाने, म्हस्कू खैरे, महादेव कुंभारकर, शिवाजी खेंगरे, अमृता बोरकर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## अवैध दारू प्रतिबंध समिती तात्काळ स्थापन करा ; मन्सूर शेख

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती**: बारामती तालुक्यात अवैध दारू व्यवसायाविरोधात कठोर कारवाईची मागणी करत सामाजिक कार्यकर्ते मन्सूर कमाल शेख यांनी मा. उपविभागीय अधिकारी, बारामती यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. महाराष्ट्र शासन गृह विभागाच्या (दि:११) मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार अवैध दारूस प्रतिबंध घालण्यासाठी समिती तात्काळ स्थापन करून प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी या निवेदनाडरे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार उपविभागीय दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरावर समिती गठीत करून अवैध दारू निर्मिती, विक्री, वाहतूक तसेच संबंधित गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मात्र बारामती तालुक्यात विविध भागांमध्ये हातभट्टी, अवैध दारू विक्री, बेकायदेशीर वाहतूक आणि सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या अवैध धंद्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे.

या अवैध व्यवसायामुळे युवक वर्ग व्यसनाधीन होत असून महिला व सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक वेळा स्थानिक नागरिकांनी तक्रारी करूनही प्रभावी कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असल्याचे मन्सूर शेख यांनी म्हटले आहे.

यावेळी त्यांनी प्रशासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये शासन निर्णयानुसार बारामती विभागात समिती तात्काळ कार्यान्वित करणे, नियमित बैठका घेऊन विशेष मोहीम राबविणे, पोलीस विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग व महसूल विभाग यांच्या संयुक्त कारवाया आयोजित करणे, अवैध दारू विक्री सुरू असलेल्या ठिकाणांवर कठोर कायदेशीर कारवाई करणे, नागरिकांसाठी हेल्पलाईन सुरू करणे तसेच शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णयाची माहिती ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांना देऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. बारामती तालुक्यात वाढत चाललेल्या अवैध दारू व्यवसायामुळे सामाजिक वातावरण बिघडत असून युवकांचे भविष्य धोक्यात येत असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा अर्जदार मन्सूर कमाल शेख यांनी व्यक्त केली आहे.

## हभप कोंडीराम इचके यांची हस्तलिखित ज्ञानेश्वरी-तुकाराम गाथा पूर्ण

**कवठे येमाई** : - मनामध्ये तीव्र इच्छाशक्ती व संकल्पित कार्य जिद्दीने पूर्णत्वाकडे नेण्याचा मानस असला की ते कार्य पूर्णत्वाकडे जाते च. असाच एक प्रत्यय व अनुभव पाहावयास मिळाले तो म्हणजे शिरूर तालुक्यातील कवठे येमाईच्या इचकेवाडीत वास्तव्यस असणारे शासनाच्या जल संपदा विभागातून उपकार्यकारी अभियंता पदावरून निस्वार्थपणे सेवा करीत सेवानिवृत्त झालेले व त्यानंतर केवळ समाजसेवा,प्रभोधन व पारमार्थिक सेवेत लिन झालेले हभप कोंडीराम तानाजी इचके यांनी मागील ३ वर्षापूर्वी ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी व संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराज यांची गाथा हे दोन ग्रंथ स्वतःच्या हस्ताक्षरात लिखित स्वरूपात उतरविण्याचा संकल्प केला.व नुकतीच त्या दोन्ही हस्तलिखित ग्रंथांचे लिखाण पूर्ण झाले.व आज दि. २२ ला त्यानिमित्ताने इचके कुटुंबीयांनी हस्तलिखित ग्रंथांचे विधिवत पूजन,श्री सत्यनारायण महापूजा,महाप्रसाद,जागरण गोंधळ या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.सेवा निवृत्त झालेले कोंडीराम इचके यांनी २२ वर्षे पंढरीची पायी वारी केली. आज वयाची ६८ वर्षे सुरु असताना देखील मागील तीन वर्षांपासून येथील घोडनदी किनारी असलेल्या ऐतिहासिक श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात एकांतात व अखंडपणे बसत या दोन्ही हस्तलिखित ग्रंथांची निर्मिती केली. याच बरोबर गावरान गायी अंगनी का असावी याचा सखोल अभ्यास करून याच इचके कुटुंबाने आपल्या घरा बाजूकडील गोठ्यात सुंदर अशी खिल्लार (गावठी) गाय व तिचे वासरू जीवापाड सांभाळली आहे.

## द•ख•ल

### बेलवंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन महिन्यांत २१२ रुग्णांना रेबीज प्रतिबंधक लस

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील बेलवंडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीत भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माहितीनुसार बेलवंडी,उक्कडगाव,येळपणे,पिंपरी कोलंदर,पिंपळगाव पिसा,आसपासच्या गावात एप्रिल महिन्यात तब्बल १३७ रुग्णांना कुत्र्याने चावा घेतला तर मे महिन्यात आतापर्यंत ७५ नागरिकांना कुत्रा चावल्याच्या घटना घडल्या आहेत. या सर्व रुग्णांवर बेलवंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून रेबीज प्रतिबंधक लसी देण्यात आल्या असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी सोनवणे यांनी दिली आहे. मागील दोन महिन्यापूर्वी बेलवंडीत एका ६ वर्षीय बालकाचा म्रत्यू रेबीजने झाला होता. दोन दिवसापूर्वी गावातीलच तरुणाला पहाटे एका भटक्या कुत्र्याने चावा घेतला होता . बहुतेक रुग्णांना त्यांच्या घरातील, शेजारी असणाऱ्या कुत्र्याने चावा घेतला असल्याच्या घटना घडल्या आहेत. गावातील मुख्य रस्ते, बाजारपेठ, शाळा परिसर तसेच वस्ती भागात भटक्या कुत्र्यांचे टोळके मोठ्या प्रमाणात फिरताना दिसत आहेत. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा अचानक कुत्रे अंगावर धावून येत असल्याने अपघात होण्याचाही धोका वाढला आहे. भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण आणि बंदोबस्त तातडीने करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, आरोग्य विभागाने नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले असून कुत्रा चावल्यास तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन उपचार व लस घेण्याचा सल्ला दिला आहे.

### साईसेवा पतसंस्था व साईसेवा मल्टिस्टेटच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील साईसेवा पतसंस्था आणि साईसेवा मल्टिस्टेट मधील कथित गैरव्यवहार प्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत.त्यानुसार सर्व पदाधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील साईसेवा पतसंस्था आणि साईसेवा मल्टिस्टेट मधील कथित कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणात जिल्हा सत्र न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती त्यावर जिल्हा सत्र न्यायालयाने या प्रकरणात साईसेवा पतसंस्था आणि साईसेवा मल्टिस्टेटच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे न्यायालयाचे आदेश देण्यात आले आहेत त्यामध्ये चेअरमन, व्हाइस चेअरमन तसेच सचिव यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हा सत्र न्यायाधीश दादासाहेब शिंगाडे यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे.या आदेशामुळे संबंधित संस्थांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, गुंतवणूकदार आणि ठेवीदारांमध्येही या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू आहे. अनेक दिवसांपासून या संस्थांतील आर्थिक व्यवहारांबाबत विविध तक्रारी पुढे येत होत्या. त्यानंतर हे प्रकरण न्यायालयात पोहोचले होते.न्यायालयाच्या आदेशानंतर आता संबंधित पोलीस यंत्रणा पुढील कायदेशीर प्रक्रिया कशी राबवते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या निर्णयामुळे ठेवीदारांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

### नान्नज गावात भीषण पाणीटंचाई; तात्काळ टँकर सुरू करण्याची ग्रामस्थांची मागणी

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज गावामध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तात्काळ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. याबाबत अमर चाऊस, भुंजग दळवी सह ग्रामस्थांच्या वतीने जामखेड चे तहसीलदार बांगर यांना निवेदन देण्यात आले आहे. नान्नज ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गेल्या एक महिन्यापासून धोंडपारगाव तलावातील पाणी संपल्यामुळे नान्नज गावावर गंभीर पाणीचे संकट ओढवले आहे. गावाची लोकसंख्या मोठी असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे. सध्या वाढत्या उष्णतेमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. गावातील इंदिरानगर झोपडपट्टी, भिमनगर, साठेनगर, माळगल्ली, पेठ गल्ली, तळेगल्ली, शिवाजी नगर आदी भागांमध्ये पाण्याची टंचाई अधिक तीव्र असून महिलांना व नागरिकांना भर उन्हात एक ते दोन किलोमीटर अंतरावरून डोक्यावर पाणी आणावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नान्नज गावाची लोकसंख्या सुमारे आठ हजारांच्या आसपास असल्याने गावाला तातडीने जास्तीत जास्त टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे. तसेच प्रशासनाने त्वरित दखल घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. निवेदन देतावेळी अमर चाऊस, सद्दाम पठण, भुजंग दळवी, कमलेश साळवे, भिवा साठे, केशव माने, बाळु गवळी, अजय रजपूत, सुभाष साळवे, आदी ग्रामस्थ सह्या होत्या.

### माळेगांवातील बुद्धविहार तालुक्यासाठी आगळे – वेगळे

**हातगाव :** जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्धाचे व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनमोल विचार तालुक्यातील प्रत्येक गावातील नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी माळेगांव येथे हाती घेण्यात आलेले बुद्धविहार



तालुक्यात एक आदर्शव्रत विहार निर्माण करण्याचा संकल्प असून तो येत्या काही महिन्यातच पूर्ण करण्यात येईल अशी माहिती मधुकर कचरू म्हस्के यांनी दिली आहे. ते म्हणाले की,मी मूळचा माळेगांव येथील रहिवाशी असून मुंबई महानगर पालिकेच्या एकूण ७ झोनपैकी पर्यावरण विभागाशी निगडीत असलेल्या झोनमध्ये मी अनेक वर्ष कार्यकारी अभियंता म्हणून काम केले नंतर नियमांप्रमाणे सेवानिवृत्त झाल्यानंतर माळेगांव येथे येऊन स्वतःची जागा मोफत देऊन त्या जागेत एक आगळे – वेगळे बुद्ध विहार स्वखर्चाने तयार करण्याचा निर्णय घेतला असून सदर विहाराचे भूमिपूजही ह भ प राम झिंजुर्के महाराज व आमदार मोनिकाताई राजळे आणि भीमशक्तीचे प्रदेश सरचिटणीस प्रा. चंद्रकांत कर्डक यांचेसह इतरही प्रमुखांच्या शुभ हस्ते नुकतेच पार पडले असून सुरू करण्यात आलेल्या या कामाचा दर्जा अत्यंत समर्पक करण्याचा माझा मनोदय असून थोड्याच दिवसात पूर्ण होणारे हे बुद्धविहार तालुक्यासाठी आदर्शव्रत विहार असणार असून तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनमोल आणि समतेचे विचार तालुक्यातील प्रत्येक गावात पोहचवण्याचा माझा या पुढच्या काळात प्रयत्न असून या कामी आमदार मोनिकाताई राजळे यांचेही मोठे योगदान लाभणार असल्याचे सांगून या साठी अखिल भारतीय भटक्या – विमुक्त संघटनेचे शेवगाव तालुका प्रमुख गोरखनाथ गाडेकर, दिलीप महाराज,भारतीय जनता पक्षाचे तालुका उपाध्यक्ष बापूसाहेब धनवडे, गोरक्षनाथ गावडे,किरण म्हस्के, जालिंदर गाडेकर, दत्ता म्हस्के या प्रमुखासह इतरही प्रमुख ग्रामस्थांचे अनमोल असे सहकार्य लाभत आहे असेही शेवटी मधुकर म्हस्के यांनी सांगितले आहे.

# कुस्तीमुळे मल्लांसह कुटुंबाला मानसन्मान मिळतो : शिर्के

## सारोळा कासार येथे उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबीर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका :** कुठल्याही क्षेत्रातील व्यक्तीला आपली ओळख स्वत: सांगावी लागते, परंतु पैलवानाला सांगावे लागत नाही की मी पैलवान आहे. तो समोरून आला की लोकं म्हणतात पैलवान आला. कुस्ती हे क्षेत्र असे आहे की, त्यात निरोगी शरीर तर लाभतेच परंतु फक्त पैलवानच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाला समाजात ब मिळत असतो असे प्रतिपादन महाराष्ट्र केसरी अशोक शिर्के यांनी केले.

नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे जयबजरंग तालीमच्या माध्यमातून कर्मवीर विद्यालयात युवा महाराष्ट्र केसरी विष्णू खोसे आणि सैन्य दलातील नामांकित कुस्तीपटू निवृत्त सुभेदार शंकर खोसे यांच्या मार्गदर्शनाखाली १ मे ते ३० मे या कालावधीत उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबीर सुरु आहे. या शिबिरात सहभागी कुस्तीपटूंना महाराष्ट्र केसरी अशोक शिर्के यांनी मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, आजची युवा पिढी मोबाईल मध्ये गुंतत चालली आहे. त्यातून बाहेर पडत कुस्ती सह इतर खेळ निरोगी शरीरासाठी आणि करिअर साठीही आवश्यक आहेत. जिद्द आणि कष्ट या जोरावर लाल मातीचं मैदान गाजवणाऱ्या कुस्तीपटूंना सैन्य दल, पोलिस दल यामध्ये नोकरीच्या संधी मिळत आहेत. जय बजरंग तालमीत सराव करणाऱ्या हर्षवर्धन कुसेकर याची नेव्ही मध्ये तर निखील जाधव याची सैन्य दलात निवड झाली ही गावच्या आणि त्या दोन्ही कुटुंबाच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट आहे. खोसे बंधूंच्या मार्गदर्शनाखाली या शिबिरातील कुस्तीपटूंना संधी मिळाली आहे. त्याचे त्यांनी सोनं करावं असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी शिवव्याख्याते ॲड. आदित्य मुस्के यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास बाजार समितीचे सहसचिव संजय काळे, माजी उपसरपंच जयप्रकाश पाटील, संजय धामणे, नाना पारधे, उत्तम कडूस, धनंजय खर्से, राहुल शिर्के, उरुळी कांचन केसरी ॲड. विकास महाडीक, शेखर महाडीक, नचिकेत दुधाळ,स्वप्निल चव्हाण, मिलिंद महाडीक, गोरख शिर्के, बब्बू इनामदार आदी उपस्थित होते. प्रास्ताविक विष्णू खोसे, सूत्रसंचालन दत्ता जाधव यांनी केले तर वैष्णवी भोसले हिने आभार मानले.

**गरजू कुस्तीपटूला वर्षभरासाठी ६० हजारांची मदत !**

जय बजरंग तालमीत सराव करणारा गरजू कुस्तीपटू तुषार धामणे याचे कुस्तीतील कसब पाहून त्याला चांगला खुराक मिळावा व तो अधिक चांगला कुस्तीपटू व्हावा यासाठी उरुळी कांचन केसरी व उद्योजक ॲड. विकास महाडीक यांनी दरमहा ५ हजार रुपये या प्रमाणे वर्षभराच्या खर्चासाठी ६० हजार रुपयांच्या मदतीचा धनादेश यावेळी दिला. पैशांअभावी एखाद्या मुलाला कुस्तीचा सराव सोडवा लागू नये म्हणून त्यांनी दाखविलेल्या दातृत्वाचे उपस्थितांनी कौतुक केले.

## ना. विखे व आ. कर्डिले यांच्या प्रयत्नातून वीज पुरवठा पूर्ववत

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** ४ एप्रिल रोजी झालेल्या गारपीट व वादळात पाथरकर डीपी जवळील आठ पोल व विजेच्या तारा जमीन दोस्त झाल्या होत्या गेल्या ४५ दिवसापासून वीट पुरवठा खंडित झालेला होता त्यामुळे लाखो रुपयाची पिके विजे अभावी जळून खाक झाली.

मात्र पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अक्षय कर्डिले यांच्या माध्यमातून महावितरण प्रशासनाच्या सम वयातू न काही दिवसात समस्या मार्गी लागल्याने शेतकरी वर्गात समाधान व्यक्त होत आहे. या परिसरातील शेती पंप बंद पडले होते त्याचबरोबर शेकडो एकर शेतीतील पिकांना पाणी देणे कठीण बनले होते सध्याच्या उन्हाळ्याची तीव्रता वाढत असून ऊस भाजीपाला फळबाग तसेच खरी पूर्व पिकासाठी पाण्याची मोठी गरज होती अशा परिस्थितीत वीज पुरवठा खंडित झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते

ही बाब माजी खासदार सुजय दादा विखे व आमदार अक्षय दादा कर्डिले यांच्या निदर्शनात आणून देण्यात आली त्यांच्या सूचनेनुसार वामन सर यांनी महावितरण अधिकारी सातत्याने पाठपुरवठा केला त्यानंतर पाथर्डी कार्यकारी अभियंता धनंजय जाधव व मिरी सब स्टेशनचे इंजिनियर गरजे साहेब लाईनमन अरविंद पाठक संतोष कोलते पोपट पालवे वैशाली गव्हाणे यांनी तातडीने ठेकेदार आप्पा बोरुडे व बोडके यांच्याशी संपर्क साधून आठ पूल व वीज वाहिनी दुरुस्त केली.

## चिखलीत १६३ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**लिंपणगाव :** चिखली येथे माता लिलाबाई झेंडे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त रामदास झेंडे मित्रमंडळाच्या वतीने विविध जाती-धर्मातील १६३ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. आयुष्यभर संघर्ष करून कुटुंबाला यशाचे शिखर गाठून देणाऱ्या माता लिलाबाई झेंडे यांच्या प्रेरणेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

या सन्मान सोहळ्यात जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस, सोपानराव मुळे यांच्यासह अनेक मान्यवरांचा गौरव करण्यात आला. पांडुरंग क्षीरसागर महाराज, बाळासाहेब नाहाटा आणि राजेंद्र म्हस्के यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन ज्येष्ठांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गा तांबे तसेच ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मणराव ढोबळे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटीलकाका महाराज होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी आजच्या काळात मुलं शिक्षणासाठी व नोकरीसाठी परदेशात जात असून अनेक आई-वडिलांना वृद्धाश्रमाचा आधार घ्यावा लागतो, अशी खंत व्यक्त केली. रामदास झेंडे मित्रमंडळाने ज्येष्ठांचा केलेला सन्मान समाजासाठी आदर्श असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बाबासाहेब भोस म्हणाले, चिखलीकरांनी माझ्या राजकीय विजयांना मताधिक्याची आणि विचारांची झालर दिली. राजकीय संन्यासानंतर याच भूमीत माझा झालेला सन्मान माझ्यासाठी भावनिक क्षण आहे. रामदास झेंडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले. आईने कष्ट करून संसार उभा केला आणि चांगले दिवस दाखविले. त्याच प्रेरणेतून ज्येष्ठांचा सन्मान करण्याचा उपक्रम हाती घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात बाळासाहेब नाहाटा, राजेंद्र म्हस्के, दिनकर पंधरकर, पुरुषोत्तम लगड, नवनाथ बोडखे, संजय धामणे, संतोष पंधरकर, पोपटराव पवार आणि राणी झेंडे यांनीही मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनंदाश्रम स्वामी व रामेश्वर तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले तर आभार रमेश झेंडे यांनी मानले.

## शेवगावच्या पाणीपुरवठा योजनेसाठी वाढीव निधीची मागणी


प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**अमरापूर :** शेवगाव शहराच्या पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, तसेच वाढीव निधी उपलब्ध करून नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी शिवसेनेचे नेते श्री. अरुण मुंढे यांनी महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा मंत्री मा. गुलाबराव पाटील यांच्याकडे मुंबई येथे झालेल्या सदिच्छा भेटीत केली. यावेळी शेवगाव शहराची वाढती लोकसंख्या, भविष्यातील पाण्याची वाढती गरज आणि शहरातील विद्यमान पाणीपुरवठा व्यवस्थेतील अडचणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांना नियमित, शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा मिळण्यासाठी शहरातील पाणी योजना तातडीने पूर्णत्वास नेणे आवश्यक असल्याचे श्री. मुंढे यांनी सांगितले. तसेच सदर योजनेसाठी वाढीव निधी मंजूर करणे, प्रलंबित प्रशासकीय प्रक्रियांना गती देणे आणि संबंधित विभागामार्फत आवश्यक ती कार्यवाही त्वरित करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी मंत्री महोदयांकडे केली.

## पैठण उजवा कालव्यातील पाणी सुटल्याने समाधान

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**हातगाव :** पैठण जलाशयाच्या उजवा कालव्यातून पाण्याचे आवर्तन सुटल्याने ऐन तीव्र उन्हाळ्यात कालव्यालगत असलेल्या अनेक गावातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर बनलेला पाणी प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.पैठण उजवा कालवा हा १३२ की मी च्या अंतराने माजलगावापर्यंत नेऊन तेथील असणाऱ्या धरणात तो झिरो करण्यात आला असल्याने व सध्या कालव्यात सुटलेल्या या आवर्तनामुळे शेवगाव तालुक्यातील खडके, मडके, खिर्डी, खामपिंपरी, प्रभुवाडगाव, लखमापुरी, पिंगेवाडी, हातगाव, कांबीसह इतरही काही गावातील ग्रामपंचायतीने पाईपलाईंद्वारे पाणी नेऊन आपआपल्या गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवलेला असल्यामुळे या सुटलेल्या आवर्तनामुळे ऐन उन्हाळ्यात मोठी मदत होणार आहे. गेली ८ ते १० दिवसापासून उष्णतेने मोठा कहर केला असल्यामुळे घराच्या बाहेर पडणे देखील कठीण झाले असून जमिनीमध्ये असणाऱ्या पाण्यानेही शेवट केला असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पैठण जलाशयाची निर्मिती होताना शेवगाव तालुक्यातील असंख्य गावांना विस्थापित व्हावे लागले असून त्यामुळेच त्यावेळी धरणाची निर्मिती झालेली आहे. जलाशयातून डावा व उजवा असे दोन कालवे गेलेले असून डावा कालवा जवळपास २५० की मी च्या अंतराने नांदेडपर्यंत नेण्यात आला असून उजवा कालवा मात्र माजलगाव पर्यंत नेण्यात आलेला आहे. उजवा कालवा हा पैठण,शेवगाव,गेवराई व माजलगाव या ४ तालुक्यासाठी वरदान ठरला असल्याने त्याचा या चारही तालुक्यातील शेतीच्या सिंचनासाठी मोठा फायदा होत आहे.

# सिद्धटेक येथील भीमानदीचा पूल

## १० दिवसांसाठी वाहतुकीसाठी बंद

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**कर्जत :** सिद्धटेक (ता.कर्जत) येथील भीमानदी वरील मोठ्या पुलाचा गावाकडील स्लॅब व त्या खाली असलेला भराव यांची झीज झाल्याने त्याच्या दुरुस्तीसाठी १० दिवस दि २३ मे ते ३ जूनपर्यंत सदरच्या पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली असल्याची माहिती कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता प्रशांत वाकचौरे यांनी दिली. त्यामुळे भाविकांनी आणि सर्वसामान्य वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

अष्टविनायक तीर्थक्षेत्रापैकी कर्जत तालुक्यातील सिद्धटेक येथे गणेशभक्तांची मोठी वर्दळ असते. सध्या उन्हाळ्याचे दिवस व शैक्षणिक सुट्टीचा कालावधी असल्याने यात पर्यटकांची मोठी वर्दळ पहावयास मिळते. नगर-पुणे जिल्ह्यास जोडणारा जवळचा मार्ग रामा ६८ म्हणून दौंड-राशीन-करमाळा-कर्जत यांना जोडणारा सिद्धटेक येथील भीमानदी वरील २० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेला मोठया पुलाचा सिद्धटेक गावालगतचा स्लॅब आणि त्याच्या खालील असणारा भराव याची झीज झाली असल्याचे निदर्शनास आले. खबरदारीचा उपाय म्हणून त्याची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता प्रशांत वाकचौरे आणि त्यांच्या पथकाने सदरच्या पुलाची पाहणी करीत वरिष्ठांना अहवाल सादर केला. सदरच्या पुलाचा स्लॅब आणि त्याखालील भराव याची झीज झाली असल्याचा निष्कर्ष मिळाला असून त्यानुसार दि २३ मे ते ३ जून या १० दिवसांच्या या कालावधीत सिद्धटेक येथील भीमानदी वरील मोठा पुलाचे दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून सदरचा पूल वरील कालावधीत वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे भांबोरा-सिद्धटेक-दौंड वाहतूकीसाठी पर्यायी मार्गाचा वापर करावा असे आवाहन कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आले आहे.

**दौंडला जाण्यास पर्यायी मार्गाचा वापर**

सिद्धटेक भीमानदी वरील पुलाचे काम होईपर्यंत वाहनचालकांनी राशीन मार्गे दौंडला जाण्यास करमाळा-राशीन-भांबोरा- जलालपुर-श्रीगोंदा मार्गे दौंड तसेच पर्यायी मार्ग दुसरा म्हणून करमाळा-राशीन-भिगवण-दौंड या मार्गे वाहतूक वळविण्यात आली असल्याचे प्रसिध्द पत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाने काढले आहे.

## शंभर टक्के जनगणना पूर्ण करणाऱ्यांचा सन्मान

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका :** भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने देशभर सुरू असलेल्या जगातील सर्वात मोठ्या डिजिटल जनगणना मोहिमेला अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात वेग आला असून आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना २०२७ चे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. प्रत्येक प्रगणकाला ३० दिवसांचा कालावधी आणि निश्चित प्रभागनिहाय घरांची जबाबदारी देण्यात आलेली असताना काही कर्मचाऱ्यांनी अवघ्या तीनच दिवसांत जनगणनेचे १०० टक्के काम अचूक पूर्ण करत नवीन आदर्श निर्माण केला आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात ४२ अंश तापमानातही अवघ्या तीन दिवसांत १०० टक्के जनगणनचे कामकाज पूर्ण करणाऱ्या बुरुडगाव झोनमधील प्रगणक व पर्यवेक्षक यांचा अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहायक आयुक्त मेहेर लहारे, उपायुक्त एस.बी. तडवी, अमोल कोतकर,ऋषीकेश सातपुते उपस्थित होते.

प्रभाग समिती क्रमांक चार बुरुडगाव चार्ज अधिकारी एस.बी.तडवी व पर्यवेक्षक अभिजीत जोशी व योगेश गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली घरयादी गट क्रमांक १८६ चे प्रगणक भाऊसाहेब कबाडी,सर्कल २७ मधील प्रगणक संजय शिंदे व भारती गुंड यांनी अवघ्या तीन दिवसांत जनगणनचे शंभर टक्के काम पूर्ण करत नवा आदर्श निर्माण केला आहे.त्याबद्दल आयुक्तांनी प्रगणक व पर्यवेक्षक यांचा विशेष सन्मान करत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.

## ग्रामीण कृषी जागरूकता आणि कृषी औद्योगिकला भव्य प्रारंभ



**जामखेड :** जामखेड तालुक्यातील सोनेगाव येथे दि. १५ मे २०२५ : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषी महाविद्यालय, हाळगाव येथील बी.एस्सी. (कृषी) अंतिम वर्षातील कृषिदूतांचे सोनेगाव येथे दि. १५ मे रोजी उत्साहात आगमन झाले. ग्रामीण कृषी जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत पुढील २४ आठवडे कृषिदूत विद्यार्थी क्षितीज संगपाळ, सचिन सपकाळे, दिग्विजय शिंदे, विशाल शिंदे, साहिल शिंगटे आणि आर्यन सुपेकर हे गावात वास्तव्यास राहून शेतकरी बांधवांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती, मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिके देणार आहेत. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील शेतीची प्रत्यक्ष माहिती मिळणे, शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेणे आणि संशोधनाधारित तंत्रज्ञान गावपातळीपर्यंत पोहोचविणे हा आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शनिवार दि.२३ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

दैनिक राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | परभणी
जाहिरात छोटी ऑफर मोठी
जाहिरातीचा आकार
4 x 5
प्रति दिन दर
100/-
विशेष ऑफर
5 जाहिरातींवर 2 फ्री
10 जाहिरातींवर 5 फ्री
15 जाहिरातींवर 7 फ्री
20 जाहिरातींवर 10 फ्री
जास्त जाहिरात... जास्त फायदा!
आपली जाहिरात... आपल्या व्यवसायाची ओळख!
संपर्क :
महादेव नजन 9404246302
भरत थोरात 90966 23891
संतोष आंबेकर 74482 62310

## वैजापूर तालुक्याला अवकाळीचा तडाखा

### वादळी वाऱ्यामुळे घरांची पडझड





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : सलग दोन दिवस वैजापूर तालुक्याच्या काही भागात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे घरांची पडझड होऊन नागरिकांचे अतोनात नुकसान झाले. शुक्रवारी दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास वैजापूर शहरासह लगतच्या काही भागात सोसायटीच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे शहराच्या काही भागात झाडे कोसळली, व विजेचे खांब पडल्याच्या घटनाही घडल्या. सायंकाळी काही तास खंडित झाला होता. याचा नागरिकांना त्रास सहन करावा लागला. गेल्या चार-पाच दिवसांपासून आग ओकणाऱ्या सूर्याच्या उष्णतेपासून नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाला असला तरी वादळ वाऱ्यामुळे ग्रामीण भागात प्रचंड नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

तालुक्यातील भादली येथे गुरुवारी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे प्रभाकर सोनवणे यांच्या घराचे पत्रे उडून गेले. अनेक शेतकऱ्यांचे सोलार पॅनल उडून गेल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले. आमदार रमेश पाटील बोरनारे यांनी घटनास्थळी भेट देऊन झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला तेच संबंधित अधिकाऱ्यांना नुकसानीचा पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या.

शुक्रवारी दुपारी तालुक्यातील नांदगाव,भगाव व परिसरतील काही गावांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाच्या सरी कोसळल्या. त्यामुळे या भागात घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली व शेतकऱ्यांचे नुकसान झाले. यात कैलास कोल्हे यांचे शेड नेट पूर्ण फाटले. तर पंचफुला योगेश गाढे यांचा घर कोसळले. भाऊसाहेब रहाणे यांच्या घराचे नुकसान झाल्याचे समोर आले असून नवनाथ रहाणे यांच्या कांदा चाळीचे नुकसान झाले आहे. तसेच नारायण थोट,, राजू थोट, संतोष परनामे, यांच्या घराचे नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे.

## श्रीरामपूर मार्केट कमिटीत कांद्याचा लिलाव एक रुपयाने

### शेतकरी संघटना आक्रमक



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा मार्केटमध्ये कांद्याचा लिलाव चक्क एक रुपये किलो दराने झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हताश झालेल्या शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ड. अजितदादा काळे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी शिष्टमंडळासह बाजार समितीत धडक देत प्रशासनाला धारेवर धरले. ॲड. अजित काळे यांनी बाजार समितीचे सचिव वाबळे यांना थेट लिलाव स्थळी नेत अनेक प्रश्न उपस्थित केले. ग्रेडरची उपलब्धता, व्यापाऱ्यांना दिलेले परवाने, प्रत्यक्ष लिलावात उपस्थित व्यापाऱ्यांची संख्या, बोली प्रक्रिया तसेच हमाली-तोलाई कपातीबाबत त्यांनी प्रशासनाला जाब विचारला.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या २ मे २०२५ च्या परिपत्रकाचा आधार घेत हमाली व तोलाई कपात केली जात असल्याचे प्रशासनाने सांगितले. मात्र, हे परिपत्रक कायदा नसून त्यात शेतकऱ्यांकडून कपात करण्याचा स्पष्ट उल्लेख नसल्याचा आक्षेप ड. काळे यांनी घेतला. मार्केट कमिटी व आडते बेकायदेशीरपणे शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत, असा आरोप त्यांनी केला. यावेळी सचिव वाबळे यांनी हमाली-तोलाईची कपात शेतकऱ्यांच्या बिलातून केली जाणार नसल्याचे सांगत तसे पत्र काढण्याचे आश्वासन दिले. तसेच आतापर्यंत झालेल्या कपातीची रक्कम शेतकऱ्यांना परत करावी, अशी मागणीही संघटनेकडून करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १२ रुपये ३५ पैसे दराने कांदा खरेदी करावी, कमी दराने खरेदी झालेल्या कांद्याचा फरक शेतकऱ्यांना परत द्यावा, नाफेडचे नियम लागू करावेत तसेच लूज मार्केट सुरू करून गोणी खर्च वाचवावा, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. मागण्या मान्य न झाल्यास मार्केट कमिटी व कांदा मार्केट बंद आंदोलनाचा इशारा शेतकरी संघटनेने दिला. यावेळी शरद आसने, साहेबराव चोरमल, सचिन वेताळ, बापूसाहेब गोरे, सुजित बोडखे, ड. प्रशांत कापसे, कैलास भणगे आदींसह अनेक शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्रीरामपूर पंचायत समितीसमोर ढोल बजाव आंदोलन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील बेलापूर ग्रामपंचायतीच्या नवीन बांधलेल्या घरकूल व निकृष्ट दर्जाच्या अनागोदी कारभाराची सखोल चौकशी झालीच पाहिजे. या मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्य रमेश अमोलिक यांनी उपोषणाचे हत्यार उपसले असून शुक्रवारी श्रीरामपूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्याच्या दालनासमोर प्रशासनाला खास जाग आणण्यासाठी तीन तास 'ढोल बजाव आंदोलन' पुकारले होते.त्यावेळी पं.स.परिसर दणादूण सोडला होता.याबाबत सविस्तर माहिती अशी की,मौजे ऐनतपूर येथे गट क्र.१३१ यामध्ये घरकूल बांधण्यात आले.शासनाने ठरून दिलेल्या नियमांनुसार घरकुलाचे अद्याप काम पूर्ण झाले नाही. अजूनही काही घराचे काम अपूर्ण आहेत.वाढीव पैसे मागणी प्रशासनानी केली.त्यामुळे नागरिकांत नाराजी सूर उमटविला आहेत.विद्यमान सदस्य अमोलिक यांनी उपोषण सुरू केले आहे.मागील चार महिन्यापूर्वी पंचायत समितीसमोर उपोषण केले होते.

मागील चार महिन्यापूर्वी घरकूल सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी करत वरिष्ठ पातळीवरून करण्यात यावी असे अमोलिक यांचे म्हणणे आहे.त्यावेळी गटविकास अधिकाऱ्यानी उपोषण स्थगित करावेत,अशी विनंती करून उच्चस्तरीय समिती नेमणूक करण्यात येईल,असे आश्वासित केले होते.मात्र निवेदनाची चार महिने उलटूनही कोणतीही कारवाई झाली नसल्याने अमोलिक यांनी प्रशासनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.त्यावेळी प्रशासनाने कोणतेही लेखी आश्वासन दिले नसल्याने अमोलिक यांनी पंचायत समितीसमोर ढोल बजाव आंदोलन केले.विशेष म्हणजे विद्यमान सदस्यांना उपोषण करण्याची वेळ आली. यावेळी अमोलिक म्हणाले की, गटविकास अधिकाऱ्यानी निवेदनाची दखल घेतल्यास कार्यालयात 'झुरळ सोडू' आदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला.

## वर्षभरापूर्वी चोरी झालेल्या घरात पुन्हा घरफोडीचा प्रयत्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील सेवानिवृत्त शिक्षक शंकर आश्रु शेवाळे यांच्या घरात वर्षभरापूर्वी मोठी चोरी झाल्यानंतर आता पुन्हा घरफोडीचा प्रयत्न झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शंकर शेवाळे (वय ७०) हे वांबोरी येथील सुभाषनगर परिसरात राहतात. दि. २० मे रोजी दुपारी ते घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. दि. २१ मे रोजी दुपारी परत आल्यानंतर त्यांना घराच्या दरवाज्याचा कोंडा तुटलेला दिसला. तसेच सेंटर लॉक तोडण्याचा प्रयत्न झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अज्ञात चोरट्यांनी कंपाउंडवरून घरात प्रवेश करून घरफोडीचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, दि. १९ मे २०२५ रोजी याच घरात चोरी होऊन सुमारे ८ तोळे सोन्याचे दागिने व १ लाख २५ हजार रुपयांची रोकड लंपास करण्यात आली होती. या प्रकरणी शंकर शेवाळे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४), ६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



## शिबलापूर येथून मुलाचे अपहरण; अज्ञाताविरुद्ध गुन्हा



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील माळेवाडी-शिबलापूर परिसरातून एक १७ वर्षीय मुलगा बेपत्ता झाला असून, त्याला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मुलाच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सौ. मंगल संजय पवार (वय ४०, रा. माळेवाडी, शिबलापूर) या मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांचा १७ वर्षीय मुलगा सिद्धांत संजय पवार हा १० वी पर्यंत शिकलेला असून तो लहानपणापासूनच काहीसा मंदबुद्धीचा आहे. तो घरीच असायचा आणि नेहमीप्रमाणे घरातील शेळ्या चारण्यासाठी रानात जात असे. दिनांक १५ मे २०२६ रोजी सायंकाळी सिद्धांतच्या खिशात तंबाखूची पुडी सापडल्याने, त्याचे वडील संजय पवार यांनी त्याला रागावून एक चपराक मारली होती. त्यानंतर तो घरातील इतरांसोबत झोपी गेला. दुसऱ्या दिवशी, १६ मे रोजी सकाळी तो नेहमीप्रमाणे शेळ्या घेऊन रानात गेला. मात्र, सायंकाळी त्याचे आई-वडील मजुरीवरून घरी परतले असता, सिद्धांत घरी आढळून आला नाही.

सिद्धांत घरी न परतल्याने हवालदिल झालेल्या कुटुंबीयांनी त्याची आजूबाजूला आणि नातेवाईकांकडे चौकशी केली. इतकेच नव्हे तर शिबलापूर शिवारासह अकोले, संगमनेर, घोटी आणि इगतपुरी यांसारख्या विविध ठिकाणी त्याचा शोध घेण्यात आला. मात्र, सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. अखेर, आपल्या मुलाला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने काहीतरी आमिष दाखवून किंवा फुस लावून पळवून नेल्याची खात्री पटल्यानंतर आईने आश्वी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

**मुलाचे वर्णन : सिद्धांत संजय पवार**
**उंची: ५ फूट, रंग : सावळा, बांधा: जाड**
**पोशाख : अंगात लाल रंगाचा शर्ट, काळ्या रंगाची फुल जीन्स पॅन्ट आणि पायात चप्पल.**

याप्रकरणी मंगल पवार यांच्या फिर्यादीवरून आश्वी पोलिस स्टेशनमध्ये पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, मुलाचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत. अशा वर्णनाचा मुलगा कोठे आढळल्यास तात्काळ आश्वी पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## यांत्रिक बोट नादुरुस्त झाल्याने वावरथ, जांभळी, जांभूळबन ग्रामस्थांचा संपर्क तुटला



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : मुळा धरणाच्या अथांग पाण्यावर बारागांव नांदूर धक्का ते जांभळी धक्का दरम्यान चालणारी प्रवासी यांत्रिक बोट नादुरुस्त झाली. त्यामुळे मागील चार दिवसांपासून धरणाच्या पलीकडील वावरथ, जांभळी, जांभुळबन या गावांमधील ग्रामस्थांचा राहुरी तालुक्याशी संपर्क तुटला आहे.राहुरी तालुक्यातील ही तीन गावे मुळा धरणाच्या पाण्याने तीन बाजूंनी वेढली आहेत.

या गावांमधील नागरिकांना धरणाच्या अथांग पाण्यातून प्रवासी यांत्रिक बोटीत प्रवास करून बारागांव नांदूर मार्गे राहुरी येथे तालुक्याच्या ठिकाणी यावे लागते. परंतु मागील चार दिवसांपूर्वी यांत्रिक बोटीचा गिअर बॉक्स तुटल्याने बोट बंद पडली आहे. जांभळी वरून यांत्रिक बोटीतून बारागांव नांदूर मार्गे प्रवास करून राहुरी शहरात आल्यास एकूण १६ किलो मीटर अंतर आहे. जांभळी वरून रस्ता मार्गे राहुरीला यायचे असेल तर ढवळपुरी-अहिल्यानगर मार्गे १०० किलोमीटर किंवा वनकुटे, चास, आग्रेवाडी, म्हैसगांव मार्गे ८० किलो मीटर फेरा मारावा लागतो. यांत्रिक बोट बंद पडल्याने वेळ व प्रवास खर्च तिनपट वाढला आहे. दररोज ३०० ते ४०० नागरिक यांत्रिक बोटीतून प्रवास करीत होते. बोट बंद पडल्याने ज्यांना राहुरीला जाणे अत्यंत गरजेचे आहे.

असे अवघे ३० ते ४० नागरिक मासेमारी करणाऱ्या खासगी छोट्या होडीतून जीव मुठीत धरून जलप्रवास करीत आहेत. त्यामुळे मागील चार दिवसांपासून राहुरी तालुक्याशी या गावांचा संपर्क तुटल्यात जमा आहे. बंद पडलेली यांत्रिक बोट जुनी व कालबाह्य झाली आहे. त्यामुळे नवीन यांत्रिक बोट मिळणे गरजेचे आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे पाठपुरावा करून तत्कालीन राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी जिल्हा नियोजनातून ९० लाखांना मंजुरी घेतली होती.

महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांच्या मापदंडा नुसार बोटीचा आराखडा तयार करून ठेकेदाराला यांत्रिक बोट पुरविण्यास सहा महिन्यांची मुदत दिली होती. परंतु महाविकास आघाडी सरकार बदलले. त्यानंतर संबंधित ठेकेदाराला वारंवार मुदतवाढ देण्यात आली. ती यांत्रिक बोट आज पर्यंत मुळा धरणात आली नाही. या बाबत महिला संघर्ष समिती अध्यक्षा वर्षा बाचकर म्हणाल्या कि, वावरथ, जांभळी, जांभुळबन गावांना धरणाच्या अथांग पाण्यातून जीवघेणा प्रवास करावा लागतो. शासकीय कामे, आजारपण, बँकेची कामे, शिक्षण, शेतमाल वाहतूक अशा सर्वच बाबतीत बोटीवर अवलंबून राहावे लागते.

सध्याची बोट जुनी कालबाह्य झाली आहे. ती तातडीने दुरुस्ती व्हावी. नवीन यांत्रिक बोट मिळावी. अशी मागणी वर्षा बाचकर यांनी केली. रामदास बाचकर म्हणाले कि, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या पाठपुराव्यातून नवीन यांत्रिक बोटीसाठी जिल्हा परिषदे तर्फे ९० लाखांचा निधी मंजूर झाला. परंतु मागील पाच वर्षात नवीन बोटीचे अवघे ६० टक्के काम झाले आहे. जुनी बोट कालबाह्य झाली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी लक्ष घालावे. नवीन यांत्रिक बोट उपलब्ध करून द्यावी. अशी मागणी रामदास बाचकर यांनी केली.

## राहुरीत विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाच्या तडाखा

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शहरात अवकाळी पावसाने काल सायंकाळी सात वाजता मोठ्या प्रमाणात विजेच्या कडकडाटासह धुमाकूळ घातल्यामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली. राहुरी शहरात काल सायंकाळी सात वाजण्याचा सुमारास अवकाळी पावसाने विजयच्या कडकडाटासह चांगलीच हजेरी लावली. त्यामुळे अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली. काल दिवसभर मोठ्या प्रमाणात उकाडा जाणवत होता व दुपारनंतर हळूहळू आकाशात ढग जमण्यास सुरुवात झाली त्यानंतर सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास मोठ्या प्रमाणात विजेच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली.



राहुरी शहरात झालेल्या पावसामुळे श्री शनी मंदिर जवळ पाणी साचले होते **(छाया राजेंद्र परदेशी)**

अचानक आलेल्या या पावसामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांची एकच धावपळ उडाली. त्यातच वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे नागरिकांच्या धावपळीत अजून भर पडली. अचानक आलेल्या या पावसामुळे रस्त्यावरील नागरिक भाजी विक्रेते व हात गाड्या वाले यांची मोठ्या प्रमाणात धांदल उडाली. त्यातच राहुरी नगर मनमाड महामार्गावर राहुरी फॅक्टरी जवळ वाहतुकीची कोंडी झाल्यामुळे व रस्त्याचे ठिकठिकाणी काम सुरू असल्याने प्रवासी वाहतूक करणारे वाहने व प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली रस्त्याचे काम धिम्या गतीने सुरू असल्याने वाहनधारकांना रस्त्यावर मोठी कसरत करावी लागत होती.

झालेल्या या पावसाने सर्वत्र चिडचिड झाली होती. पावसापेक्षा विजांचा कडकडाटाचे प्रमाण जास्त होते. राहुरी शहरातील ही रस्त्यांची कामे अपूर्ण असल्यामुळे नागरिकांची रस्त्यावरून चालताना कसरत करावी लागत होती झालेल्या पावसाने ठिक ठिकाणी खड्ड्यात पाणी साचल्याने अपघात होण्याची भीती निर्माण झाली होती. अर्धा तास सुरू असलेल्या या पावसामुळे हवेत काहीसा गारवा निर्माण झाल्याने नागरिकांना उकाड्यापासून थोड्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

## राजू शेट्टी अन् सदाभाऊ खोत यांची 'चाय पे चर्चा'

### ऊसदर आंदोलनाचं निमित्त; एकाच टेबलवर रंगला गप्पांचा फड



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : एकेकाळी ऊस आंदोलनाच्या मैदानात खांद्याला खांदा लावून लढणारे, मात्र नंतरच्या काळात राजकीयदृष्ट्या एकमेकांपासून दुभंगलेले दोन मोठे नेते अनेक वर्षांनंतर जाहीरपणे एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी आणि रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत यांनी इंदापूर न्यायालयाच्या आवारात एकत्र येत चहाचा आनंद घेतला.

या दोन्ही दिग्गज नेत्यांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठे राजकीय मतभेद निर्माण झाले होते. मात्र, आज अचानक हे दोघे एकाच टेबलवर बसून चहा पिताना आणि गप्पा मारताना दिसल्याने उपस्थित शेतकरी कार्यकर्त्यांसह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातील अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत हे इंदापूर येथे राजकीय कारणास्तव नाही, तर एका जुन्या आंदोलनाच्या केसच्या तारखेसाठी एकत्र आले होते. २०११ साली महाराष्ट्रात उसाला योग्य दर मिळावा यासाठी राज्यभर अतिशय तीव्र ऊस आंदोलन झाले होते. या आंदोलनादरम्यान राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांच्यासह अनेक आंदोलक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले होते. याच खटल्याच्या सुनावणीसाठी शुक्रवारी इंदापूर सत्र न्यायालयात तारीख होती.

इंदापूर सत्र न्यायालयातील कामकाज संपल्यानंतर एक धक्कादायक पण सुखद चित्र पाहायला मिळालं. राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांनी कोर्टाबाहेर येत एकाच हॉटेलच्या टेबलवर, एकत्र बसण्याचा निर्णय घेतला. दोन्ही नेत्यांनी एकत्र चहाचा आस्वाद घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि काही वेळ मनमोकळ्या गप्पा मारल्या. अनेक वर्षांनंतर हे दोन जुने सहकारी जाहीरपणे एकत्र आल्याने कोर्टाच्या आवारात कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती.